


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा







रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २२.१०.२०२४ | अंक नं. १९७ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020
















## संदीप कोतकर यांच्या जिल्हा बंदीबाबत आता जिल्हा न्यायालयात २४ ऑक्टोबरला सुनावणी



नगर – केडगाव येथील दुहेरी हत्याकांड प्रकरणात आरोपी असलेल्या माजी महापौर संदीप कोतकर यांच्या अहमदनगर जिल्हा बंदी शिथिल करण्याच्या मागणी अर्जावर आता अहमदनगर जिल्हा न्यायालयात गुरुवारी (दि.२४) सुनावणी होणार आहे. मंगळवारी (दि.२२) दुपारी झालेल्या सुनावणी वेळी फिर्यादीच्या विनंतीनुसार न्यायालयाने सुनावणी पुढे ढकलली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वतः किंवा पत्नीच्या उमेदवारी व प्रचारासाठी माजी महापौर संदीप कोतकर यांची लांडे खुन प्रकरणातील जिल्हाबंदी २० ऑक्टोबर ते १ डिसेंबर या कालावधीसाठी शिथिल करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण व रेवती मोहिते डेरे यांनी शुक्रवारी (दि.१८) हे आदेश दिले आहेत.

दरम्यान, केडगाव हत्याकांडातही संदीप कोतकर हे आरोपी असून या गुन्ह्यातील जिल्हाबंदीची अट शिथिल करण्यासाठी त्यांनी नगरच्या जिल्हा न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्यावर मंगळवारी सुनावणी होती. मात्र या प्रकरणातील फिर्यादी संग्राम कोतकर यांनी म्हणणे मांडण्यासाठी अवधी मागितला.

त्यामुळे जिल्हा न्यायधीश श्री. शेख यांनी सुनावणी २ दिवस पुढे ढकलत ती २४ ऑक्टोबरला ठेवली असल्याची माहिती अॅड. महेश तवले यांनी दिली.





### जिल्हा शासकिय रुग्णालयाच्या वॉर्डमध्ये मोकाट कुत्र्यांचा वावर

कुत्रे चावल्यानंतर जेथे उपचार घ्यायला जावे लागते, त्या जिल्हा शासकिय रुग्णालयात मोकाट कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. रुग्णालय परिसर आणि थेट वॉर्डमध्ये हे मोकाट कुत्रे बिनदिक्कतपणे फिरत आहेत. या कुत्र्यांमुळे रुग्णालयातील उपचार घेत असलेल्या रुग्णांच्या आणि त्यांच्या नातेवाईकांच्या जिवालाही धोका निर्माण झाला आहे. रुग्णालय प्रशासनाने याबाबत तातडीने दखल घेवून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे. (छाया – बबलू शेख)

# अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघातून पहिल्या दिवशी १८ इच्छुक उमेदवारांनी नेले अर्ज




तहसील कार्यालयात विधानसभा निवडणुकीसाठी उभारण्यात आलेला नामनिर्देशनपत्र तपासणी कक्ष व त्यामधील नियुक्त कर्मचारी. (छाया–लहू दळवी)

**आमदार संग्राम जगताप, माजी महापौर अभिषेक कळमकर, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, किरण काळे यांचा समावेश; ३७ अर्जांची विक्री**

नगर – अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघातून पहिल्याच दिवशी विद्यमान आमदार संग्राम जगताप, माजी महापौर अभिषेक कळमकर, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, किरण काळे यांच्यासह १८ जणांनी उमेदवारांनी ३७ अर्ज नेले आहेत. विधानसभा निवडणुकीची अधिसूचना २२ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झाल्यानंतर उमेदवारी अर्ज विक्री व स्वीकृती सुरू झाली आहे. निवडणूक अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

तहसील कार्यालयात निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र तपासणी कक्ष स्थापन करण्यात आला असून, याच कक्षातून अर्ज विक्रीची प्रक्रिया सुरू आहे. पहिल्या दिवशी २२ ऑक्टोबर रोजी आ. संग्राम जगताप, एकनाथ हरिभाऊ गायकवाड, किरण गुलाबराव काळे, मदन संपत आढाव, प्रकाश चंद्रकांत फराटे, शोभा परमेश्वर बडे, शेख परवेज उमर, शेख ताहीर रफिक, अॅड. शिवाजीराव वामन डमाळे, अश्पाक यास्मीन शेख, चंद्रशेखर उर्फ बाळासाहेब मारुती बोराटे, रमेश सुनील निकम, विनोद छगनराव काकडे, रावसाहेब शंकर काळे, तायगा बापू शिंदे, प्रतीक अरविंद बारसे, अभिषेक बाळासाहेब कळमकर आदींनी स्वतः अथवा हस्तकाकरवी उमेदवारी अर्ज नेले आहेत.

आ. संग्राम जगताप यांच्यासाठी अनुप काळे, अभिषेक कळमकर यांच्यासाठी प्रकाश पोटे, किरण काळे यांच्यासाठी रोहिदास साळवे तर बाळासाहेब बोराटे यांच्यासाठी आदित्य बोराटे यांनी उमेदवारी अर्ज नेले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी २९ ऑक्टोबर अंतिम मुदत आहे तर ३० ऑक्टोबरला दाखल उमेदवारी अर्जांची छाननी होणार असून ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज माघारी घेता येणार आहेत.

## पावसाच्या पाण्याबरोबर गटारही रस्त्यावर प्रवाहीत





पावसाने गांधी मैदान येथील गटारीतून पाणी उफाळून बाहेर येत होते. सर्वत्र घाण पाणी पावसाच्या पाण्याबरोबर रस्त्यावर वाहत होते. त्यातूनच नागरिक, विद्यार्थी रस्ता काढत होते.

नगर – शहरातील गटारींची कामे किती तकलादू आहेत हे एकाच पावसाने उघडे पाडले आहे. सोमवारी (दि. २१) सकाळी शहराच्या काही भागात काही वेळ पडलेल्या पावसाने गटारीतील पाणी उकळ्या मारत थेट रस्त्यावरील पावसाच्या पाण्याबरोबर वाहत असल्याचे दिसून आले. घाण आणि मैलामिश्रीत पाणी रस्त्यावर आल्याने त्याची मोठ्या प्रमाणात दुर्गंधी सुटली होती.

शहरातील गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय मंदिरासमोरील गटारीवर लोखंडी झाकण टाकलेले आहे. सकाळी झालेल्या पावसाच्या पाण्याचा दबाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने गटारीवरचे लोखंडी झाकण सहज बाजूला सरकले आणि गटारीतील पाणी उकळ्या मारत बाहेर पडले. पावसाच्या पाण्यात हे काळे घाण मैलामिश्रीत पाणी वाहू लागले. याच घाण पाण्यातून तेथील शाळेचे विद्यार्थी, दूधवाले, भाजीवाले, भाविक, नागरिक रस्ता शोधत मार्ग काढत होते. संपूर्ण गटारीचे पाणी वर आल्याने परिसरात घाणीचे साम्राज्य आणि दुर्गंधी पसरली. स्वच्छतेत बक्षिसे जिंकणाऱ्या महापालिकेचे गटारीच्या कामाचे नियोजन किती तकलादू आहे हे पुन्हा एकदजा नगरकरांच्या अनुभवास आले.



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक



# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## स्वप्नातल्या कळ्यांना, उमलून द्या - बहरू द्या

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

स्वप्न बघणे हा माणसाचा जिवंतपणा आहे. ज्याला स्वप्नच पडत नाही तो माणूसच नाही. मात्र लॉटरी लागल्याचे स्वप्न म्हणजे भिकेचे डोहाळे होत. 'करोडपतीचे' स्वप्न किंवा 'छप्पर फाडके'चे स्वप्न म्हणजे मनाच्या दुबळेपणाचे लक्षण आहे.

स्वप्नातून कर्तृत्वावरचा विश्वास ठाम व्हावा लागतो. ज्याच्या कर्तृत्वाच्या यशोपताका दशदिशांना फडकतात त्याच्या स्वप्नांची पूर्तताच त्यात असते.

स्वप्नं पडावीच लागतात. नव्हे, पडलीच पाहिजेत. स्वप्नं म्हणजे भावी सूचनांचे (भविष्याचे) सोनेरी देव. स्वप्न म्हणजे मनाला सुंदर विचारांची नि आचारांची उभारी देणारे घर. स्वप्न म्हणजे क्षितीज कवेत घेण्याची क्रियात्मक झेप.

बाकी स्वप्नांच्या व्याख्या मानसशास्त्रज्ञ किंवा अन्य कुणी काहीही करोत; पण मानवी मनाला उभारी देण्यात ज्या काही जाणिवा सोबत असतात, त्यात स्वप्नांचा वाटा खूप मोठा असतो.

संवेदना असलेल्या मनालाच चांगली स्वप्ने पडतात. भव्य-दिव्य व चांगली स्वप्ने बघायला, पडायला बहुत सुकृत लागते.

स्वप्न जगण्याचे बळ देतात. जी चांगली स्वप्ने बघतात त्यांच्या स्वप्नांना अडसर न होता अंगण द्यावे. ध्येयाने प्रेरीत स्वप्नांना कर्तृत्वाचे शामियाने बहाल करावे यातच आपले व समाजाचेही भले आहे.



## कारची चारचाकीला धडक तीन वर्षीय बालिकेचा मृत्यू

### अपघातात एक जण जखमी; जेऊर शिवारातील घटना

नगर - कारची अज्ञात चारचाकी वाहनाला पाठीमागून धडक बसून झालेल्या अपघातात कार मधील तीन वर्षीय बालिकेचा मृत्यू झाल्याची घटना जेऊर (ता. नगर) शिवारातील पार्थ हॉटेल समोर घडली. जोएस स्टीफन भोरे (रा. मिरज, ता. मिरज, जि. सांगली, हल्ली रा. सिडको धुत हॉस्पिटल समोर, छत्रपती संभाजीनगर) असे मयत बालिकेचे नाव आहे. कार मधील तिची आई जखमी झाली आहे.

शनिवारी (दि.१९) सकाळी साडेसहाच्या सुमारास हा अपघात झाला. या प्रकरणी जखमी सारीका स्टीफन भोरे (वय २६, रा. मिरज, ता. मिरज, जि. सांगली, हल्ली रा. सिडको धुत हॉस्पिटल समोर, छत्रपती संभाजीनगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून त्यांचे पती कार चालक स्टीफन सुधाकर भोरे (रा. मिरज, ता. मिरज, जि. सांगली, हल्ली रा. सिडको धुत हॉस्पिटल समोर, छत्रपती संभाजीनगर) याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी, त्यांचे पती व मुलगी शनिवारी सकाळी त्यांच्या कार (क्र.एमएच २० एफजी ३९१३) मधून छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर रस्त्याने जेऊर शिवारातून जात असताना कारने समोर चाललेल्या अज्ञात वाहनाला पाठीमागून धडक दिल्याने हा अपघात झाला असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.





केडगाव इंडस्ट्रीयल इस्टेट येथे सनराईज् बेकरी जवळ औद्योगिक माल घेऊन आलेला कंटेनर ड्रेनेजलाईनमध्ये फसलेला छायाचित्रात दिसत आहे (छाया - अमित मन्यार)

## फुटलेल्या चेंबर व नाल्यामधून मैलामिश्रीत पाणी रस्त्यावर

नगर - केडगाव इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये अनेक दिवसापासून फुटलेल्या चेंबर व नाल्यामधून मैलामिश्रीत पाणी अक्षरश : रस्त्यावर वाहत आहे. यामुळे परिसरामध्ये घाणीचे साम्राज्य पसरले असून मोठ्या प्रमाणात डासाचे प्रमाण देखील वाढले आहे. या डासांमुळे औद्योगिक वसाहतीमधील कामगार तसेच परिसरातील अयोध्यानगर वासियांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्याच इंडस्ट्रीयल इस्टेट मधील बोथरा गेट ते पालवे ईस्टेट या रस्त्याचे काम चालू असल्यामुळे नागरिकांना या मैलामिश्रीत पाणी वाहणाऱ्या रस्त्यावरून जावे यावे लागत आहे. हा एकच पर्यांयी रस्ता रहदारीसाठी उरला आहे. याच रस्त्यावर आता पायी चालणे देखील मुश्किल झाले आहे.

त्यातच आज सकाळी सकाळी औद्योगिक वसाहतीमध्ये कंपन्यांचा माल घेऊन येणारा मोठा कंटेनर या नाल्याच्या दलदलीत फसला. चालकाला नाल्याचा अंदाज न आल्यामुळे हा कंटेनर फसला आहे. सुदैवाने हा कंटेनर शेजारीच असलेल्या उच्च विद्युत वाहिनी खांबावर पलटी होता होता वाचला अन्यथा अपघात होऊन औद्योगिक वसाहितीसाठी मोठा धोका निर्माण झाला असता. उच्च वाहिनी विद्युत खांबा जवळच हा कंटेनर फसल्यामुळे काही काळ या भागाची वीज खंडित करण्यात आली होती. आधीच चाललेला विजेचा लपंडाव आणि त्यातच हा खेळखंडोबा औद्योगिक वसाहतीसाठी नुकसानदायक ठरत आहे असे आता येथील उद्योजक व परिसरातील नागरिक बोलत आहेत

## सौ. मंगलाबाई भंडारी यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर - तापिदास गल्ली, आडते बाजार येथील सौ. मंगलाबाई



वसंतलाल भंडारी (वय ६८) यांचे २२ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्या अत्यंत धार्मिक मनमिळावू व शांत स्वभावाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती वसंतलाल, मुलगा नितीन, मुलगी नयना, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

वसंतलाल भंडारी (पारनेरवाला) यांच्या पत्नी, स्व. रमणिकलाल, विनोदलाल, दिलीपलाल, सुभाषलाल, जयकुमार मुथ्था (सराफ) यांच्या बहिण होत.

## शेतकऱ्यास आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर - दोघांच्या त्रासाला कंटाळून शेतकऱ्याने शेतातील बांधावरील कडूनिंबाच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील गुणवडी गावच्या शिवारात घडली आहे. या प्रकरणी दोघांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा नगर तालुका पोलिस ठाण्यात दाखल झाला आहे.

मनोहर मारुती शेळके (वय ४४, रा. गुणवडी, ता.नगर) असे या मयत शेतकऱ्याचे नाव असून त्याची पत्नी स्वाती मनोहर शेळके यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात सोमवारी (दि. २१) फिर्याद दिली आहे. यामध्ये म्हंटले आहे की आपले पती मनोहर शेळके यांनी १७ ऑक्टोबर रोजी सकाळी ८.३० च्या सुमारास शेतातील बांधावरील कडूनिंबाच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली होती.

त्यांचे जिल्हा शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आल्यावर विधिवत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यानंतर आपण रविवारी (दि.२०) रात्री पतीचा मोबाईल पाहत असताना त्यातील व्हाटसअप वर मेसेज पाहिला असता त्यात अंबादास उंडे याच्या त्रासाला कंटाळून मी आत्महत्या करत आहे. हा मेसेज पाहिल्यावर अंबादास नामदेव उंडे व त्याचा मुलगा दीपक अंबादास उंडे या दोघांच्या त्रासाला कंटाळूनच आपल्या पतीने आत्महत्या केली असून त्यांच्या मृत्यूस हे दोघेच जबाबदार आहेत.

या फिर्यादीवरून पोलिसांनी दोघांच्या विरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## केडगावात शिक्षिकेचे घर भरदिवसा फोडून चोरी; सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरट्यांनी पळविली

नगर - सध्या दिवाळीची लगबग सुरु झालेली असताना शहर व परिसरात चोरट्यांनी चांगलाच उच्छाद मांडला आहे. केडगाव उपनगरात तर सोमवारी (दि. २१) भरदिवसा एका शिक्षिकेचे घर चोरट्यांनी फोडून घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली आहे. सकाळी १० ते दुपारी ३.३० या कालावधीत भुषणनगर परिसरातील निंबाळकर कारखान्याजवळ असलेल्या सद्गुरू अपार्टमेंट मध्ये ही चोरी झाली आहे.

याबाबत वैष्णवी अनिल चांदणे यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या केडगावमधीलच पोदार स्कूल मध्ये शिक्षिका असून त्या घराला कुलूप लावून शाळेत गेलेल्या असताना सकाळी १० ते दुपारी ३.३० या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी त्यांचे घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरात सर्वत्र उचकापाचक करत कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ६० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. दुपारी ३.३० च्या सुमारास फिर्यादी घरी आल्यावर त्यांना घरात चोरी झाल्याचे समजले. ही माहिती त्यांनी पोलिसांना दिल्यावर पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

वैष्णवी चांदणे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## किशोर साळवी यांचे अल्प आजाराने निधन

नगर - तारकपूर येथील रहिवासी तसेच सेंट झेव्हिअर्स



कॅथड्रेल चर्च, तारकपूर येथील तबला वादक भजनी मंडळाचे किशोर जॉर्ज साळवी (वय ७३) यांचे २२ ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्यावर बुऱ्हाणनगर येथील कब्रस्तान स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## 'बीएसएनएल'ची केबल चोरणाऱ्या तिघांना पकडले

### भिंगार कॅम्पच्या रात्रगस्त पथकाची कारवाई; आणखी एक गुन्हा उघड

नगर - बीएसएनएल कंपनीची जमिनीत गाडलेली १३७ मीटर लांबीची ओएफसी केबल चोरून नेणाऱ्या तिघांना भिंगार कॅम्प पोलिसांच्या रात्रगस्त पथकाने पाठलाग करून पकडले आहे. त्यांच्या ताब्यातून केबल, ३ मोटारसायकल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रकाश रभाजी वाघ (रा. निंबोडी, खंडोबा मंदिराशेजारी, ता.नगर), श्रीप्रसाद गोविंदराव म्हेत्रे (रा. तपोवन रोड, साईबाबा मंदिराशेजारी), दिपक सुभाष गायकवाड (रा. लोहसर खांडगाव, ता. पाथर्डी, हल्ली.रा. तांबे मळा, बुरुडगाव रोड) असे पकडलेल्या आरोपींची नावे आहेत.

भिंगार कॅम्प पोलिसांचे पथक रविवारी (दि.२०) रात्री १०.३० च्या सुमारास गस्त घालत असताना त्यांना स्टेट बँक चौक ते आय लव नगर रोडवर कॉन्व्हेंट हायस्कुलजवळील दक्षिण बाजुस जमिनीत गाडलेली १३७ मीटर लांबीची तांब्याची दुरध्वनी केबल ही तीन अनोळखी ईसम व्हॅक्स ब्लेडच्या साहाय्याने कट करुन चोरुन घेऊन जात असल्याचे दिसले. त्यांचा पोलीस पथकाला संशय आल्याने त्यांनी त्यांच्याकडे चौकशी करत असताना त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देऊन पळुन जाण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा पाठलाग करुन त्यांना शिताफीने पकडले. सदर इसमांना ताब्यात घेऊन त्यांचेविरुद्ध कॅम्प पोलीस स्टेशन गुन्हा भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करुन नमुद आरोपींना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. नमुद आरोपीतांनी यापुर्वी नटराज हॉटेल समोरील गुरुद्वाराजवळील जमिनीत गाडलेली ४० हजार रुपये किमतीची टेलिफोन केबलची चोरी केल्याची कबुली दिली आहे.

सदरची कारवाई स.पो.नि.जगदीश मुलगीर यांचे मार्गदर्शना खाली पो.हे.कॉ. दिपक शिंदे, रवी टकले, संदिप घोडके, अजय गव्हाणे, थोरात, चालक बेरड, पो.कॉ. प्रमोद लहारे, अमोल आव्हाड, समीर शेख यांनी केली.



बीएसएनएलची ओएफसी केबल चोरणाऱ्या तिघांना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत भिंगार कॅम्प पोलिसांचे पथक.

## पद्माकर वाघुलकर यांचे हृदयविकाराने निधन



नगर - फकीरवाडा, गौरवनगरमध्ये राहणारे पद्माकर शिवाजी वाघुलकर (वय ६७) यांचे २२ ऑक्टोबर रोजी पहाटे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, १ मुलगा, सुन असा परिवार आहे. परितोष वाघुलकर यांचे ते वडील होत.

## रतीलाल गुंदेचा यांचे संथारा व्रतात निधन

नगर - पुणे येथील दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलजवळील



हिमाली सोसायटीत राहणारे रतीलाल माणिकचंद गुंदेचा (वय ७७) यांचे २१ ऑक्टोबर रोजी ९.१५ वाजता संथारा व्रतात निधन झाले. त्यांच्यावर २२ ऑक्टोबर रोजी पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सून, तीन भाऊ, एक बहिण, भाऊजया जावई, नातवंडे असा परिवार आहे. राजेश गुंदेचा यांचे ते वडिल व प्रकाश फुलचंद बोरा यांचे मेहुणे तसेच प्रमोद प्रेमसुख गांधी यांचे ते चुलत सासरे होत.

## पगार मागितल्याच्या रागातून तरूणाला लोखंडी रॉडने मारहाण

### सावेडी उपनगरातील घटना; तिघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - पगार मागितल्याच्या रागातून तरूणाला लोखंडी रॉड व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. विनायक बाळासाहेब माळवे (वय २८, रा. पाइपलाइन हाडको, एकविरा चौक, सावेडी) असे मारहाण झालेल्या तरूणाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संदीप बाबर (रा. तपोवन रस्ता, सावेडी), अक्षय टकले (रा. निर्मलनगर, सावेडी) व अजय लहामगे (रा. एकविरा चौक, सावेडी) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. विनायक हा अजयच्या पान स्टॉलवर १० वर्षांपासून कामाला होता. त्याला पगार मिळत नसल्याने त्याने गेल्या तीन महिन्यापासून काम सोडले होते. तो अजयकडे पगार मागत असल्याने त्यांच्यात वाद होत होते. रविवारी (दि.२०) रात्री १० वाजता संदीप, अक्षय हे दोघे विनायकच्या घरी आले. त्यांनी 'अजय लहामगे यांच्या नादाला लागतो का, तुझा आज पगारच करून टाकतो' असे म्हणून लोखंडी रॉड, लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले.

भांडण सोडविण्यासाठी आलेल्या वडिल, भाऊ, वहिणींना शिवीगाळ करून मारहाण केली. घराबाहेर अजय उभा होता. तो विनायकला म्हणाला, 'तु माझ्याकडेच काम करायचे तु माझ्याकडे काम नाही केले तर तुला नगरमध्ये कोठेही काम करू देणार नाही' असे म्हणून शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. विनायक तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यासाठी गेल्यानंतर त्या तिघांनी पुन्हा विनायकच्या घरी जाऊन शिवीगाळ केले असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

## एसटी बस चालकाला नगरमध्ये लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण

### चाँदणी चौकातील घटना; तारकपुरच्या एकाविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - एसटी बसचा कट लागल्याचा आरोप करत एकाने बस चालकाला मारहाण केल्याची घटना रविवारी (दि.२०) दुपारी दीडच्या सुमारास अहिल्यानगर शहरातील चाँदणी चौकात घडली. धनराज शिवाजी ताटे (वय ३७, रा. जिजाऊ नगर, बीड) असे मारहाण झालेल्या बस चालकाचे नाव आहे.

त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मारहाण करणारा संशयित वैभव दाविद बुलाखे (रा. ख्रिश्चन कॉलनी, तारकपूर) याच्याविरूध्द भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी ताटे हे पाटोदा एसटी बस डेपोत चालक म्हणून नोकरीला आहेत. रविवारी दुपारी ते त्यांच्या ताब्यातील अहिल्यानगर ते बीड जाणारी एसटी बस (क्र.एमएच २० बीएल २८३०) घेऊन जात असताना ते शहरातील चाँदणी चौकात प्रवाशी घेण्यासाठी थांबले.

तेवढ्यात तेथे दुचाकीवरून (क्र.एमएच १६ सीजे ४०३९) वैभव बुलाखे तेथे आला. त्याने ताटे यांच्याशी विनाकारण हुज्जत घालून तुझ्या एसटी बस कडून मला कट लागला आहे, असे म्हणून शिवीगाळ केली. लाथाबुक्क्यांनी मारहाण करून गचांडी पकडली. शर्ट फाडून तु एसटी बस पुढे कसा घेऊन जातो ते मी पहातोच असा दम देऊन सरकारी कामात अडथळा निर्माण केला असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार पी. ए. बारगजे करत आहेत.

## सेवानिवृत्त तहसीलदार लक्ष्मीकांत वैद्य यांचे निधन

नगर - माणिक चौक, वैद्यवाडा येथील रहिवासी सेवानिवृत्त



तहसीलदार लक्ष्मीकांत शंकरराव वैद्य (वय ९३) यांचे १९ ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

ते शुक्ल यजुर्वेदी ब्राम्हण माध्यंदिन संस्थेचे माजी अध्यक्ष व मार्गदर्शक होते. त्यांच्या मागे मुलगा, मुलगी, सुन, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

## निर्मलाताई लोंढे यांचे वृद्धापकाळाने निधन

राहुरी - तालुक्यातील संक्रापूर येथील रहिवासी निर्मलाताई



प्रभाकर लोंढे (वय ८२) यांचे १८ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर प्रवरा तीरी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात १ मुलगा, २ मुली, सून जावई, नातवंडे असा परिवार आहे. नंदकुमार प्रभाकर लोंढे, सौ. शोभा रमेश थोरात, सौ. ज्योती किशोर कानडे यांच्या त्या मातोश्री तर नगर महापालिकेत कार्यरत किशोर कानडे यांच्या त्या सासू होत.

## नगरमध्ये २३ ऑक्टोबर रोजी 'स्व. रतन टाटा श्रद्धांजली सभा'

नगर - भारतीय उद्योग क्षेत्राचे आधारस्तंभ, उद्योग महर्षी रतन



टाटा यांचे नुकतेच निधन झाले आहे. त्यांना अहिल्यानगर वासीयांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यासाठी विचार भारतीच्या वतीने श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. २३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६:३० वाजता सावेडीच्या माऊली सभागृहात होणाऱ्या या श्रद्धांजली सभेत प्रमुख वक्ते पत्रकार व लेखक उदय निरगुडकर हे मार्गदर्शन करणार आहेत. सभेच्या अध्यक्षस्थानी सिए.रमेश फिरोदिया असणार आहेत, अशी माहिती विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे यांनी दिली.

या श्रद्धांजली सभेला शहरातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे अये आवाहन विचार भारतीच्या वतीने करण्यात आले आहे.

## नगर अर्बन बँक कर्जघोटाळा प्रकरणात माजी संचालक अनिल कोठारी यांना उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

नगर - नगर अर्बन बँक कर्जघोटाळा प्रकरणी दाखल गुन्ह्यात गेल्या ९ महिन्यांपासून अटकेत असलेले बँकेचे माजी संचालक अनिल चंदुलाल कोठारी यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जामीन मंजूर केला आहे. न्या. एस.जी.मेहेरे यांनी हा जामीन मंजूर केला आहे.

अर्बन बँक कर्ज घोटाळा प्रकरणी बँकेचे माजी संचालक राजेंद्र गांधी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या गुन्ह्यात बँकेचे माजी संचालक अनिल कोठारी यांना २३ जानेवारी २०२४ रोजी पोलिसांनी अटक केली होती. तेव्हापासून ते कोठडीत होते. त्यांनी जिल्हा न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला मात्र तो फेटाळण्यात आला. त्यानंतर त्यांनी अ‍ॅड. आर.आर. करपे यांच्या मार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. त्यावर न्या. एस.जी.मेहेरे यांच्या समोर सुनावणी झाली. न्या. मेहेरे यांनी कोठारी यांना ५० हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. हा जामीन मंजूर करताना कोठारी यांनी बँकेच्या अवसायकाच्या कामकाजात हस्तक्षेप करू नये, न्यायालयाच्या परवानगीशिवाय शहर सोडू नये, पासपोर्ट न्यायालयात जमा करावा, बँकेच्या कामकाजात कुठलाही हस्तक्षेप करू नये अशा अटी न्यायालयाने घातल्या आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### आल्याच्या चहाचे लाभ

सकाळी एक कप आल्याचा चहा आपल्याला फक्त फ्रेशच करत नाही, तर अनेक आजारांशी लढायलाही मदत करतो. आल्याच्या चहाचे अँटी इन्फ्लेमट्री, अँटी बॅक्टेरियल आणि अँटी ऑक्सिडेंट गुण तब्येतीसाठी चांगले असतात.

## पाककला

### चॉकलेट शंकरपाळे

**साहित्य** : २ वाट्या मैदा, मोहनासाठी आणि तळण्यासाठी तूप, पिठीसाखर, कणभर मीठ, पीठ, भिजविण्यासाठी दूध, अर्धा टी स्पून व्हॅनिला इसेन्स.

**कृती** : मैद्यामध्ये साखर, बेकिंग पावडर, मीठ, व्हॅनिला इसेन्स घालून नीट मिक्स करून घ्या. त्यात मूठ वळेपर्यंत तुपाचे मोहन घालून, तूप सगळ्या मिश्रणाला नीट चोळून घ्या. हा गोळा अर्धा तास झाकून ठेवा. कोको पावडरमध्ये दूध घालून घट्टसर गोळा मळा. भिजविलेले पीठ आणि कोकोचे गोळा अलगद मिक्स करा. पूर्ण एकजीव न करता कोकोच्या मार्बवसारख्या लाइन्स दिसतील, असं मिक्स करा. मोठी पोळी लाटून आवडीप्रमाणे शंकरपाळे लाटून तळा किंवा ओव्हनमध्ये १८० अंश तापमानावर २० मिनिटे बेक करा. या शंकरपाळ्यांवर वरून डेमोरश शुगर भुरभुरा (ब्राऊन शुगर).

## सौंदर्य

### चेहऱ्याचा काळेपणा दूर करण्यासाठी

मसूर डाळ रात्रभर भिजत ठेवून सकाळी वाटून घ्यावी. त्यात मध किंवा दही मिसळून चेहऱ्यावर लावावे १५-२० मिनिटापर्यंत तसेच ठेवावे. नंतर आंघोळ करावी. त्याने चेहऱ्याचा काळेपणा दूर होऊन चमक येते.

## सल्ला

केस गळू नयेत म्हणून रोज काळे तीळ १ चमचा चावून खावेत.

## वास्तू

घराची पूर्व दिशा स्वच्छ व पवित्र ठेवावी. या दिशेस पाण्याचा साठा करावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २३ ऑक्टोबर २०२४

**स्वाती रवि २४:४२, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, पुनर्वसू ३०।१६, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आपणास आज संभाषणात काळजी घेण्याची गरज आहे. धावपळ जास्त होईल. देवाण-घेवाण टाळा.

**वृषभ** : स्वतःला इतर लोकांसमोर सादर करण्याचे सामर्थ्य अंगी येईल. इतर लोकांना तुमचे वचार पटतील.

**मिथुन** : आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. राजकीय विषयांमध्ये स्थिती आनंददायी राहील. अधिकार क्षेत्र वाढेल.

**कर्क** : देवाण-घेवाण काळजीपूर्वक करा. अत्यंत व्यस्त राहाल. व्यापार व्यवसायात सावध राहाणे आवश्यक. वाहने काळजीपूर्वक चालवा. शत्रूंपासून सावध राहा.

**सिंह** : मुलांवर खर्च होईल. कौटुंबिक प्रश्नांची उत्तरे मिळतील. वेळेचे भान पाळा. कामात अत्यंत व्यस्त राहाल. खर्च वाढेल.

**कन्या** : अधिक श्रम करावे लागतील. आरोग्य मध्यम राहील. व्यापार-व्यवसायात सावधगिरी बाळगा. शत्रूंपासून सावध राहा. स्त्री पक्षाचा आधार मिळेल.

**तूळ** : आज घरगुती जबाबदाऱ्यांमध्ये आपली प्रगती आपणास संतुष्टी देईल.

**वृश्चिक** : कौटुंबिक जबाबदारी वाढेल. आरोग्य उत्तम राहील. शुभ वार्ता मिळतील. शेअरमध्ये गुंतवणूक कराल.

**धनु** : एखाद्या महत्वाच्या प्रोजेक्टमध्ये यश मिळेल. मनोरंजनावर खर्च होण्याची शक्यता आहे.

**मकर** : आर्थिक स्थिती संमिश्र राहील. कुटुंबातही वेळ चांगला जाईल. वरिष्ठ लोकांचे कामात सहकार्य मिळेल. अधिकारी आपणास सहकार्य करतील.

**कुंभ** : व्यापार व्यवसायात सावध राहाणे आवश्यक. वाहने काळजीपूर्वक चालवा. दिवस उत्तम राहील. महत्वाच्या कार्यात यश मिळेल.

**मीन** : जोखमीच्या कार्यात पैसा गुंतवू नका. महत्वपूर्ण कामे यशस्वीरित्या पूर्ण होतील. आरोग्य उत्तम राहील. पत्र मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

वडील : या वेळी नापास झालास तर यापुढे मला 'बाबा' म्हणून हाक मारू नकोस चंद्या.
सालाबादाप्रमाणे याही वर्षी आपला चंद्या नापास झाला,
वडील : काय लागला निकाल?
चंद्या : माफ कर रे रम्या, तुला बाबा म्हणून हाक मारण माझ्या नशिबात नाहीये बहुतेक...

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* सन १९३८ मध्ये कोणी हैद्राबाद स्टेट काँग्रेसची स्थापना केली? - स्वामी रामानंद तीर्थ
* मंगल पांडे यांनी कोणत्या छावणीतील इंग्रज अधिकाऱ्यावर गोळी झाडली? - बराकपूर
* इलॉन मस्क हा उद्योगपती कोणत्या कंपनीशी संबंधीत आहे? - अमेझॉन
* सातारा जिल्ह्यात कोणी पत्री सरकार स्थापन केले? - क्रांतीसिंह नाना पाटील

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०३६

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ■ | ५ | ६ | ७ |
| ८ | | | | ■ | ९ | | |
| १० | | ■ | ११ | १२ | | ■ | ■ |
| १३ | | ■ | १४ | | ■ | १५ | १६ |
| | ■ | १७ | ■ | १८ | | | |
| १९ | २० | | २१ | | ■ | ■ | |
| ■ | २२ | | | ■ | २३ | २४ | |
| २५ | | | ■ | २६ | | | |

**आडवे शब्द :-** १) एकमेकात ताळमेळ नसणे किंवा मनात असलेला भेद ५) तरळ; क्षणिक; पातळ ८) कोळिष्टक ९) नदीचे उंच तीर; डोंगराची तुटलेली बाजू १०) पोक; कुबड ११) जडपणा; पत; प्रतिष्ठा १३) अनेक केस किंवा तंतू यांचा समुदाय १४) उपहास; फजिती; हुर्यो १५) उष्णतेमुळे त्वचेतून बाहेर पडणारे पाणी १८) तपस्व्यांचे राहण्याचे ठिकाण १९) आठवड्यातील सुट्टीचा दिवस; रविवार २२) चिंधीला पीळ देऊन बनविलेली वात २३) जंगल; रान; अरण्य २५) उणीव; कमतरता; वानवा २६) राजाचे मोठे सुशोभित घर

**उभे शब्द :-** १) जबाबदारी न घेणारा २) कणखर; दणकट ३) नाव; गंधाचा टिळा ४) एकसारखे बोलणे; बडबड ५) एक सुगंध लाकूड व त्याचे झाड ६) चल; खंदक; हाळ; कालवा ७) हार; माळ (फटाक्यांची वगैरे) १२) अटीची भाषा १५) जखम; वार; आघात १६) दुसऱ्याच्या मनातले ओळखणारा १७) दिनकर; भास्कर; रवि २०) वृद्धी; वाढ; प्रगती २१) अंगणात केलेले शेणाच्या पाण्याचे सिंचन २३) चालू किंवा वर्तमान दिवस २४) गव्हाचे कणीदार पीठ

### शब्दगंध क्र. ७०३५ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कि | शो | री | अ | मो | ण | क | र |
| फा | क | ■ | रा | ळ | ■ | स | सा |
| य | ■ | व | ध | ■ | ग | दा | ■ |
| त | व | ■ | ना | म | दा | र | ■ |
| शी | त | ल | ■ | ■ | रो | ■ | अ |
| र | न | ■ | पा | त | ळ | ■ | नु |
| ■ | दा | ■ | स | पा | ■ | स | न |
| आ | र | सा | ■ | स | जा | ती | य |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : मनुष्य स्वतःच स्वतःच्या नशिबाचा शिल्पकार आहे. - **स्वामी रामतीर्थ.**

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### जेनेटीक मॅपिंग म्हणजे काय?

माणसाच्या प्रत्येक पेशीत ४६ रंगसूत्रे असतात. ही रंगसूत्रे २३ जोड्यांच्या स्वरूपात असतात. यापैकी २२ जोड्या शरीरसूत्रांच्या, तर १ जोडी लिंगसूत्राची असते. व्यक्तीची शारीरिक ठेवण, डोळ्यांच्या रंग, केसांचा रंग, केसांचा प्रकार, त्वचेचा रंग, उंची, लिंग या सर्व बाबी रंगसूत्रांवर अवलंबून असतात. रंगसूत्रामध्ये वा जनुका असतात. या जनुकांवर एकेक गुणधर्म अवलंबून असतो.

काही आजार जनुकात झालेल्या बिघाडामुळे निर्माण होतात असे शास्त्रीय अभ्यासातून सिद्ध झाले आहे. या जनुका जर बदलता आल्या, तर ते आजार टाळता येतील. त्यासाठी माणसात आढळून येणाऱ्या सर्व रंगसूत्रांचा, जनुकांचा शोध घेऊन त्यांची रचना लक्षात येणे आवश्यक होते. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स या देशांनी म्हणूनच युनेस्कोबरोबर एकत्रितपणे ह्यूमन जिनोम प्रोजेक्ट सुरू केला होता. याची परिणती मानवी जनुकीय संरचना पूर्णपणे ज्ञात होण्यात झाली आहे.

जनुकांची रचना माहीत करण्याची पद्धत म्हणजे जेनेटीक मॅपिंग होय. जेनेटीक मॅपिंग करण्यासाठी संबंधित व्यक्तीचे रक्त वा उतीद्रव्य घेण्यात येतात. प्रयोगशाळेत विविध प्रक्रिया करून शास्त्रज्ञ त्यातून डीएनए हा रंगसूत्रांतील मूलभूत घटक वेगळा करतात. या डीएनएवरील न्युक्लिओसाईड्सच्या विविध संरचनांचा अभ्यास करून कोणता रोग होण्याची शक्यता आहे याचे विश्लेषण केले जाते. भविष्यात अशा रोगग्रस्त जनुकांची दुरुस्ती किंवा त्यात बदल घडवून आणण्यात येऊ शकतील आणि जगातील अनेक रोग टाळता येतील किंवा बरे करता येतील अशी आशा निर्माण झाली आहे.

### अजब ज्योतिषी

एक ज्योतिषी बाजारात बसून लोकांचे भविष्य सांगत असे. त्याचा धंदा अगदी छान चालला होता. ज्योतिष ऐकण्यासाठी त्याच्याकडे लोकांची नेहमीच गर्दी असे. त्यातून त्याला पैसाही बरा मिळे. लोकांचा त्याच्या ज्योतिषावर विश्वास होता. त्यामुळे त्याच्याकडील गिऱ्हाईकही वाढत चालले होते.

एका दिवसाची गोष्ट. तो एका इसमाचे ज्योतिष सांगण्यात गुंतला असतानाच त्याच्या शेजारी त्याच्याकडे धावत आला आणि म्हणाला, ''ज्योतिषीभाऊ, अहो तुमचं घर चोरांनी फोडलं आणि त्यातलं सगळं लुटून नेलं. चला, पळा लवकर. शेजाऱ्याचे बोलणे ऐकून घाबरलेल्या ज्योतिषाने आपले सामान लगबगीने गोळा केले आणि तो घरी जायला निघाला. न राहून ज्योतिष विचारायला आलेल्या एका इसमाने त्याला विचारले,

ज्योतिषीभाऊ, मला तुमचं आश्चर्य वाटतंय. तुम्ही दुसऱ्यांच ज्योतिष सांगता आणि ते खरंही असतं. मग तुमच्या घरी चोरी होणार आहे, हे तुम्हाला अगोदर कसं नाही कळलं?

अहो कसं कळणार! मी दुसऱ्याच ज्योतिष सांगतो त्याबद्दल मला पैसे मिळतात. स्वतःचं ज्योतिष पाहून मला थोडेच पैसे मिळणार होते? म्हणून मी ते पाहिलंच नाही बघा.

तात्पर्य : कधी कधी असंच होतं. आपल्या व्यवसायाचा इतरांना फायदा होतो. मात्र स्वतःच्या कुटुंबाला त्याचा फायदा होत नाही.

## जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



### जीवन की रोशनी

महारानी साहिबा, कोई नहीं । तुम में से कितने वहाँ मेरे साथ जायेंगे? भयभीत रानी ने पूछा। महारानी साहिबा, तुम्हें अकेले ही वहाँ जाना पड़ेगा। दरबारियों ने उत्तर दिया। मुझे कितने नौकर चाकर साथ ले जाने दिये जायेंगे? रानी ने पूछा। कोई भी नही। स्पष्ट उत्तर था ।।

वास्तव में हम जीवन की सच्चाइयों से कितने अनभिज्ञ हैं। दुनियावी स्तर पर हम बड़े चतुर और बुद्धिमान हैं परन्तु आश्चर्य है कि हम आगे आने वाले और हमारी प्रतीक्षा कर रहे कठोर और निश्चित परिणामों से बिल्कुल बेखबर हैं। इस बात से भी बेखबर हैं कि दूसरों की तरह हमें भी अकेले और खाली हाथ यहाँ से जाना होगा।

नांगे आवनु नांगे जाना। कोई न रहि है राजा राणा ।।

(भैरव वाणी भक्तों की, कबीर जी)

वास्तव में यह सब पर आने वाली निश्चित घटना है। हम रोते हुये इस संसार में आते हैं और रोते हुये ही चले जाते हैं। रोते हुये आना तो समझ में आता है। एक नवजात बच्चा माता के गर्भ से बाहर आकर रोता है क्योंकि माता के गर्भ में उलटे लटके होने के पश्चात भी उसे वहाँ ज्योतियों की ज्योति नाम का आहार मिल रहा था। इसलिये बच्चे के जन्म के पश्चात कुछ रातों के लिए हम किसी तरह की रोशनी निकट रखते हैं और जब वह रोता है, हम उसके चेहरे के तरफ रोशनी कर देते हैं और कभी-कभी बच्चे को चुप करवाने और खुश करने के लिये कुण्डी खटखटाते हैं। परन्तु अपने पिता परमात्मा की गोद में जाते समय रोना क्यों?

हम अपने ही अन्तर जीवन की करण कारण सत्ता के साथ चेतन स्तर पर अपने आप को जोड़ने के लिये स्वतन्त्र थे। यह हम इच्छा या अनिच्छा पूर्वक करने की चिन्ता फिक्र नहीं करते और बचपन से बुढ़ापे तक हमारा सारा जीवन व्यर्थ चला जाता है। एक बार यह अवसर निकल गया हम अस्तित्व की सबसे नीची सीढ़ी पर जा गिरते हैं। यह सबसे ऊपरी डंडे से सबसे नीचे वाले डंडे पर जा गिरना, अधिकतर मरणासन्न सिद्ध होता है। संसार में कई वर्षों के दौरान बनाये गये रिश्तों से संबन्ध तोड़ना दुखदायी होता है और वियोग भयानक होता है। खास तौर पर इसलिये कि इसके आने की कोई प्राथमिक सूचना नहीं दी जाती इस किराए के मकान को छोड़ने के पश्चात् कहाँ जाना है, हमें में कुछ पता नहीं, मौत के पश्चात आने वाले जीवन को क्योंकि हम इस विषय अज्ञात में गिराये जाने के समान समझते हैं इसलिये मौत हमें हैरान परेशान कर देती है। इस तरह यह सब कुछ इतना भयानक रूप धारण कर लेता है कि हम इसकी कल्पना से भी डर जाते हैं।

कबीर जब हम आये जगत महि जग हंसे हम रोय ।।

ऐसी करनी कर चलहु हम हंसे जग रोय ।।

(सलोक कबीर जी)

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### अंतरीक बल

धरती को गर्म रखने के लिये ताप रूपी बल सूर्य से मिलता है। सूर्य का ताप अखुट है। पेड़-पौधों को बल अपनी जड़ों द्वारा धरती से प्राप्त होता है। धरती का बल अथाह है। संचार साधनों को बल विद्युत से मिलता है। यातायात के साधनों को बल पेट्रोल व डीजल से मिलता है।

प्रत्येक मनुष्य को बल उसके दिमाग से मिलता है। हमारे दिमाग में अखुट आंतरिक बल का खजाना भरा हुआ है। ये बल मनुष्य को भगवान से मिलता है। भगवान की शक्ति असीम है। हम दिमाग में स्थित आंतरिक बल से किसी भी व्यक्ति को बदल सकते हैं। प्रत्येक व्यक्ति निरोगी बन सकता है और दूसरों को रोगों से मुक्ति दिला सकता है। प्रत्येक व्यक्ति धनवान बन सकता है।

हम एक स्थान पर रहते हुए पूरे विश्व को बदल सकते हैं। एक साधारण आदमी भी ऋद्धि और सिद्धि प्राप्त कर सकता है। हम विश्व के किसी भी व्यक्ति को दूरदर्शन की तरह देख और सुन सकते हैं। हम भगवान से ऐसे बातें कर सकते हैं जैसे मनुष्यों से करते हैं। हम शक्तिशाली अस्त्र-शस्त्र बना सकते हैं। हम हवा में उड़ सकते हैं।

हम जो चाहे प्राप्त कर सकते हैं परंतु यह बल हमारे दिमाग में बहुत गहराई में पड़ा है। वह बल हमें भूल गया है। इस बल को जागृत करने के लिए बहुत कठिनाइयों से भरी साधनायें वर्णित हैं। अगर उस बल को निकाल सकें तो हम समाज को मनचाही दिशा दे सकते हैं। विश्व का प्रत्येक व्यक्ति इस बल को प्राप्त कर सकता है। सिर्फ उसे सही मार्गदर्शन की जरूरत है। अभी तक सभी मनुष्य भूतकाल की नकारात्मक बातें ज्यादा करते हैं, इसलिए उनके जीवन में नकारात्मक बातें ही आती रहती हैं। अगर हम भूतकाल की बुरी चीजों को याद न करके सिर्फ वही चीजें याद करें जिनसे अपना और दूसरों का कल्याण होता है, तब हम गहन ज्ञान और महान बल को दिमाग के गहरे तलों से निकाल सकेंगे।

दिमाग की आंतरिक शक्तियां अनंत हैं। दिमाग की शक्तियां अनंत होते हुए भी हम इसका लाभ नहीं ले पा रहे हैं ।

इस पुस्तक में समय प्रबन्धन, दिमाग की शक्ति, व्यवहार कला से संसार परिवर्तन तथा ऊर्जा चक्रों पर लिखने का प्रयास किया है।

यह विचार अनेक पुस्तकों से लिये हैं। कहीं-कहीं विचार पुस्तकों से भिन्न हैं। लेखक अनेकों लोगों से मिला है, उनकी समस्याओं को समझा और सुलझाया और यह पाया कि पुस्तकों में लिखे गये विचार वास्तविकता से भिन्न हैं। वहां लेखक ने विचार अपनी समझ से लिखे हैं।

इस लिये जहाँ प्रचलित मान्यताओं और सिद्धांतों से भिन्नता है वह लेखक के अपने अनुभव से प्राप्त हुए विचार समझे जाएं। उन विचारों पर शोध की जरूरत है। उन्हें अभी किसी प्रयोगशाला में सिद्ध नहीं किया जा सकता, परंतु उनको जीवन में अपनाने से अभूतपूर्व परिवर्तन होता है।

आशा करता हूँ कि यह पुस्तक आपके जीवन में परिवर्तन लाएगी।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### षोड्श संस्कार (सोळा संस्कार)

स्त्री व पुरुष यांचे गोत्र समान नसावे. स्त्री रूपसंपन्न, चारित्र्यवान असावी तसेच पुरुषदेखील शक्तीसंपन्न व चारित्र्यवान असावा. स्त्री व पुरुष यांच्यातील गुणदोषांचा विचार करूनच विवाह केला पाहिजे. आधुनिक काळामध्ये स्त्री व पुरुषांचे रक्त तपासणी करूनच विवाह करावा.

**१४) वानप्रस्थ संस्कार :** गृहस्थाश्रमातील सर्व कर्तव्य पार पडल्यानंतर आपली मुले जेव्हा मोठी होतात. तेव्हा त्यांच्याकडे गृहस्थाश्रमाची जबाबदारी सोपवून ईश्वराची श्रद्धा, भक्ती, सामाजिक सेवा यांच्याकडे मन व शरीर वळविणे यालाच वानप्रस्थ संस्कार म्हणतात. ही भौतिक जीवन त्यागाची पहिली पायरी असते.

**१५) संन्याससंस्कार :** स्वार्थाचा त्याग करून संपूर्ण विश्वाचे कल्याण करण्याकरिता संन्यास संस्कार करतात. या संस्कारामधून मोक्षप्राप्तीचा आनंद मिळविता येतो.

**१६) अन्त्येष्टिसंस्कार :** मृत्यूनंतर शरीरातून आत्मा मुक्त झाल्यानंतर त्याला उत्तम गती मिळविण्यासाठी अन्त्येष्टिसंस्कार केला जातो. हा संस्कार पार्थिवाला अग्नी देऊन केला जातो.

अशा प्रकारे भारतीय संस्कृतीमध्ये बालकाच्या जन्मापूर्वी गर्भाधान संस्कारापासून ते मृत्यूनंतर अन्त्येष्टिसंस्कार असे महत्त्वाचे सोळा संस्कार सांगितले आहेत.

**पहिली भेट** : गर्भवती स्त्रीच्या दृष्टीने डॉक्टरांकडची पहिली भेट फार महत्त्वाची असते. आपल्या शरीराविषयी सर्व माहिती तिने डॉक्टरांना द्यावी. सुरुवातीला नियमाने सांगितल्याप्रमाणे डॉक्टरांकडे गर्भावस्थेत जाण्यापेक्षा गर्भधारणेच्या आधी तीन महिन्यांपूर्वी डॉक्टरांचा गर्भधारणेविषयी सल्ला घ्यावा. गर्भधारणा आपोआप न होता ठरवून नियोजित वेळेत व्हायला पाहिजे; परंतु तरीही असे शक्य न झाल्यास व पाळी चुकली आहे असे लक्षात आल्यास पाळीची तारीख चुकल्यानंतर १० दिवसात डॉक्टरकडे जावे; त्यामुळे बाळाच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिकवाढीच्या दृष्टीने उपाययोजना लवकरात लवकर सुरू करता येते. तसेच मातेच्या आरोग्याची काळजी घेण्यास सुरुवात होते, कारण निरोगी मातृत्वाचे सुदृढ बालक हेच ध्येय असते.

Fit mother make healthy baby. डॉक्टरांना द्यावयाची माहिती - नाव, पत्ता, वय, धर्म, लग्न किती दिवसांपूर्वी झालेले आहे. पतीचा व्यवसाय/नोकरी.

गर्भवतीच्या पहिल्या तपासणीत वजन घेतल्यावर महिन्याच्या प्रत्येक तपासणीत डॉक्टर गर्भवतीच्या वजनाची नोंद करत असतात. गर्भवतीचे वजन व्यवस्थित वाढत नसेल, तर डॉक्टर त्याबद्दल मार्गदर्शन करतात. वजनाप्रमाणेच गर्भवती स्त्रीचे रक्तप्रमाण, रक्तदाब, नाडीपरीक्षण, हृदय फुप्फुस परीक्षा, स्तनाचा आकार व ठेवण, स्तनाग्रांची ठेवण, याचेही परीक्षण डॉक्टर करतात, कारण पहिल्या खेपेमध्ये बऱ्याचशा स्त्रियांची स्तनाग्रे खोलगट असतात. गर्भवती स्त्रीने बाळाला जन्म दिल्यावर नवजात बालकाला स्तनपान करायचे असते; म्हणून स्तनपान करताना त्रास होऊ नये याकरिता स्तनाग्रे लहान असतील, तर अंघोळीच्या वेळेला हलक्या हाताने मधुर औषधांनी युक्त अशा तेलाने मसाज करून स्तनाग्रे पुढे ओढावीत. गर्भवतीच्या उदरपरीक्षणामध्ये डॉक्टर गर्भाशयाची उंची, गर्भाची हालचाल, गर्भाचे ठोके, पूर्वीच्या शस्त्रक्रियेचा व्रण याचे परीक्षण करतात. गरज वाटल्यास योनीमार्गाद्वारे डॉक्टर तपासणी करतात. योनीमार्गाद्वारे तपासणी केल्याने गर्भधारणा आहे किंवा नाही हे निदान होते. तसेच चुकलेल्या पाळीच्या तारखेपासून आतापर्यंत झालेली बाळाची वाढ बरोबर आहे किंवा नाही हे समजते तसेच योनीमार्गातील आजारांचे निदान होते.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर, मोबाईल नं- ८७९३४००४००





पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त अहिल्यानगर शहरातील यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात सांस्कृतिक महोत्सवाचे दीप प्रज्वलनाने उद्घाटन करताना पुणे सांस्कृतिक विभागाच्या जानव्ही जानकर, कोरिओग्राफर शशिकांत मिस्त्री, अभिनेता देवदत्त नागे, स्वप्निल राजशेखर, दिग्दर्शक राजू पारसेकर आदी. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त अहिल्यानगर शहरातील यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात सांस्कृतिक महोत्सव प्रसंगी कलाकारांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या शौर्यगाथेला नगरकरांची दाद

### सांस्कृतिक महोत्सवाने केले मंत्रमुग्ध, नामवंत कलावंतांचा सहभाग

नगर – होळकर घराण्यावर आलेले शत्रूचे आक्रमण परतवून लावताना पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी दाखवलेला मुत्सद्दीपणा व बुद्धी चातुर्याने शत्रूला परतून लावत दिलेली मात व जनतेचे केलेले रक्षणाचा प्रसंग नगरकरांकडून टाळ्यांची दाद घेऊन गेला. ठिकाण होते– सहकार सभागृह व निमित्त होते–पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्तच्या सांस्कृतिक महोत्सवाचे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त अहिल्यानगर शहरातील यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात सांस्कृतिक महोत्सव झाला. जय मल्हार या टीव्ही मालिकेत खंडेरायाची भूमिका करणारे अभिनेते देवदत्त नागे तसेच अभिनेत्री भार्गवी चिरमुले, चित्रपट अभिनेत्री नूतन जयंत, अभिनेता राजशेखर, हार्दिक जाधव आदींसह तब्बल ३० कलावंतांच्या संचाने हा सांस्कृतिक महोत्सव सादर केला.

यावेळी सहकार सभागृहात अहिल्यादेवींच्या नावाने जल्लोष सुरू होता. बालवयातील अहिल्यादेवींचे कार्य ते पूर्ण जीवन प्रवास या महोत्सवात उलगडून दाखण्यात आला. अहिल्यादेवींचा विवाह, राज्य कारभार, सती प्रथा बंदी, दत्तक पुत्र धोरण, देशभरातील मंदिरांचा केलेला जीर्णोद्धार असे विविध प्रसंग व अहिल्यादेवींच्या कार्याचे या महोत्सवात सादरीकरण करण्यात आले. अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्रावर पोवाडा, नाट्य, संगीत, नृत्य, माहितीपट अशा प्रयोगात्मक कलेतून झालेला कलाविष्कार नगरकरांकडून दाद मिळवून गेला.

राजू पारसेकर यांनी या महोत्सवाचे दिग्दर्शन केले. प्रोडक्शन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे व सहसंचालक श्रीराम पांडे यांच्या पुढाकाराने हा सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला. दीप प्रज्वलनाने उद्घाटन करण्यात आले. यावेळी पुणे सांस्कृतिक विभागाच्या जानव्ही जानकर, कोरिओग्राफर शशिकांत मिस्त्री, अभिनेता देवदत्त नागे, स्वप्निल राजशेखर, दिग्दर्शक राजू पारसेकर यांच्यासह अहिल्यादेवी होळकरांच्या माहेरच्या वंशातील आशा शिंदे, विचार भारतीचे अशोक गायकवाड, बाबासाहेब सानप, निशांत दातीर, अनिल निकम, अमोल निस्ताने, ज्ञानेश्वर काळे, निलेश चिपाडे, गिता गिल्डा, कालिंदी केसकर, शोभा दातीर, उषा शेंडगे, उत्कर्ष फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.अशोक भोजने, इतिहास तज्ञ नवनाथ वाव्हळ आदी उपस्थित होते.

# संत आन्ना चर्च येथे २६ ऑक्टोबरला 'मतमाऊली'च्या यात्रेचे आयोजन

नगर – सालाबाद प्रमाणे संत आन्ना चर्च, जुन्या कलेक्टर कचेरी शेजारी, नगर येथे २६ ऑक्टोबर रोजी मतमाउलीच्या ४८ व्या यात्रेचे नियोजन केलेले आहे.

यात्रेच्या निमित्ताने पवित्र मरीयेच्या डोंगराजवळ सकाळी ९ वाजेपासून दर्शनाला सुरुवात होईल व संगीतमय पवित्रमाळ सायंकाळी ५ वाजता होईल व त्यानंतर सायंकाळी ६ वाजता सणाचा भव्य संगीतमय मिस्सा होणार या असून या पवित्र मिस्साचे मुख्य याजक नाशिक कॅथोलीक धर्मप्रांताचे महागुरू स्वामी मा.रे. बिशप बार्थोल बरेटो हे आहेत. पवित्र मिस्सा नंतर सायंकाळी ८ ते १० पर्यंत स्तुती संध्या आयोजित केली आहे. सर्व भाविकांना पवित्र मारियाच्या सन्मानार्थ सर्व भाविकांनी यात्रेच्या कार्यक्रमात सहकुटुंब सहभागी व्हावे व परमेश्वराचा भरपूर कृपाशिर्वाद मिळवावा असे आवाहन संत आन्ना धर्मग्रामाचे प्रमुख धर्मगुरू फादर ब्रिस्टन ब्रिटो यांनी केलेले आहे.



### बोल्हेगाव येथील इमाम सय्यद यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश

बोल्हेगाव येथील इमाम सय्यद यांचा माजी सभापती कुमारसिंह वाकळे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश झाला. यावेळी त्यांचा सत्कार करताना अल्पसंख्या विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष साहेबान जहागीरदार आदींसह नागरिक.



न्यू आर्टस् कनिष्ठ महाविद्यालयात पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण व ब्युटीपार्लर कोर्सच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील आदी.

# न्यू आर्टस् कनिष्ठ महाविद्यालयात पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण व ब्युटी पार्लर कोर्सचे उद्घाटन

नगर – न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कनिष्ठ महाविद्यालय, अहमदनगर या गौरवशाली परंपरा असलेल्या महाविद्यालयात मोफत पोलीस व आर्मी भरतीपूर्व प्रशिक्षण व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग तसेच मोफत ब्युटी पार्लर कोर्सचे उद्घाटन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांच्या हस्ते झाले.

या प्रशिक्षण शिबिरातून महाविद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत पोलीस व आर्मी प्रशिक्षण दिले जाणार आहे तसेच कौशल्य विकास केंद्राच्या वतीने विद्यार्थिनींना मोफत ब्युटी पार्लर कोर्सचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. विद्यार्थिनींनी या प्रशिक्षण शिबिराचा लाभ घ्यावा असे संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी सांगितले. त्याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.बी.सागडे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा.कल्पना दारकुंडे, पर्यवेक्षक प्रा.सुभाष गोरे, क्रीडासंचालक प्रा.आकाश नढे, ब्युटीशियनच्या प्रमुख प्रा.प्राजक्ता भंडारी, प्रा.सातपुते दिपाली, समन्वयक प्रा.सुनंदा कर्पे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.राजेंद्र जाधव यांनी केले तर आभार पर्यवेक्षक प्रा. सुभाष गोरे यांनी मांडले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.दत्तात्रय आहेर, प्रा.चंद्रकांत फसले, प्रा.किरण वाघमोडे आदी सर्व प्राध्यापकांनी सहकार्य केले.

# 'अमेझिंग अबॅकस'च्या ११० विद्यार्थ्यांना बक्षिसे

नगर – चेन्नईच्या ईसीएमएस संस्थेने घेतलेल्या ऑनलाइन स्पर्धेत येथील 'अमेझिंग अबॅकस ॲकॅडमी'च्या ११० विद्यार्थ्यांना बक्षिसे मिळाली. त्यातील ८ स्पर्धकांना 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' हा किताब मिळाला. या स्पर्धेत देशभरातून ४००० विद्यार्थी सहभागी झाले होते. यशस्वी स्पर्धकांना प्रा. शशिकांत गाडे व माजी नगरसेवक योगिराज गाडे यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.



अमेझिंग ॲबॅकसच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रा.शशिकांत गाडे व माजी नगरसेवक योगीराज गाडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. समवेत विद्यार्थी, शिक्षक वर्ग आदी.

### आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ८ जणांना 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' किताब

गतीशील लेखन तंत्र व मुलांच्या बौद्धीक क्षमतेत वाढ होण्यासाठी अबॅकसचा उपयोग होतो. त्यासाठी चेन्नईच्या ईसीएमएस संस्थेने आंतरराष्ट्रीयस्तरावर ही स्पर्धा घेतली होती. महाराष्ट्रात २० शाखा असणाऱ्या 'अमेझिंग अबॅकसचे संचालक किरण बल्लाळ व संचालिका अश्विनी बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. राज्यभरात या संस्थेच्या २० शाखा आहेत. त्यातील २५० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. ११० विद्यार्थ्यांनी बक्षीस मिळवले दीक्षा साळवे, वेदिका दिवाण, श्रेयांश रॉय, रिद्धीवी नंदनवार, मयंक तांबेकर, राजवीर फंड अश्विन गायकवाड, पिहू पटेल या स्पर्धकांनी विशेष प्रावीण्य मिळवत 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' हा किताब मिळविला.

विद्यार्थ्यांना प्रशिक्षक प्रज्ञा विभूती, जयश्री कांबळे, आशा पवार, डिंपल शर्मा, रुक्साना शेख, पूजा इटकर, श्रद्धा देशमुख, कांचन दंडाळे, शिल्पा गटफाने, अंजली पटारे, प्रतीक्षा काकडे, रेवती बल्लाळ, मीनल बल्लाळ यांचे मार्गदर्शन लाभले. बक्षीस वितरण सोहळ्यासाठी धनश्री तोरडमल, ऐश्वर्या तोरडमल, नारकोडे, शैलेंद्र कांबळे, सागर पोटे, छायाचित्रकार यश घोडके, इशान बल्लाळ आदींसह सहकार्यांनी विशेष श्रम घेतले.

# 'हेमराज केटरर्स'च्या 'दिवाळी फराळ महोत्सवास' प्रारंभ

नगर – नगरमध्ये केटरिंग व्यवसायात तीन दशकांपासून कार्यरत असलेल्या हेमराज केटरर्सचा दिवाळी फराळ गेल्या १५ वर्षांपासून नगरकरांची दिवाळी गोड करीत आहे. केटरर्सने शुध्दता व गुणवत्तेचा संगम असलेला चविष्ट व रूचकर दिवाळी फराळ विक्रीसाठी उपलब्ध केला आहे.



हेमराज बोरा



सौ. शिला बोरा

अनारसे, करंजा, लाडूसह खुसखुशीत चकली, चटकदार शेव व चिवडा, शंकरपाळे, मोहन थाळ, काजू कतली या फराळाच्या पदार्थांना मोठी मागणी आहे. शुद्ध तुपातील मिठाई सुद्धा येथील वैशिष्ट्य आहे. खजूर बर्फी, हरियाणाची मटरी दिवाळी फराळाचा गोडवा आणखी वाढविणार आहे. केटरर्सच्या कोठी रोडवरील मुख्य दालनात फराळ विक्री सुरू झाली आहे. याठिकाणी हायजिनिक पध्दतीने फराळ तयार केला जात आहे. ३०० रूपये किलो दराने फराळ उपलब्ध आहे, अशी माहिती केटरर्सचे संचालिका सौ.शिला हेमराज बोरा यांनी दिली.

फराळाबाबत माहिती देताना श्री. बोरा यांनी सांगितले की, सन १९९१ पासून केटरिंग व्यवसायात उत्कृष्ट स्वादाची व गुणवत्तेची सेवा देत असताना १४ वर्षांपूर्वी घरगुती स्वाद व आपुलकीचा तयार दिवाळी फराळ देण्याचे ठरवले. केटरर्सने सुरुवातीपासूनच मालाच्या उत्कृष्ट दर्जाला प्राधान्य दिले आहे. यंदाही ग्राहकांना अतिशय कमी दरात नमकीन तसेच लाडू, करंजा, अनारसे, चिरोटे आदी फराळाचे पदार्थ उपलब्ध करून दिले आहेत.

शंकरपाळे, लाडू, मोतीचूर, चिवडा, मसाला शेव, बाकरवडी, चिरोटे, बेसन बर्फी, पातळ पोहे चिवडा, मका चिवडा, जोधपुरी चिवडा, बंगाली चिरोटे, हरियाणा मटरी या पदार्थांना मोठी मागणी आहे. कोलकता, राजस्थान, छत्तीसगड, राजस्थान येथील कारागीर उत्तम चवीचे पदार्थ तयार करून दिवाळी अधिक लज्जतदार बनवित आहेत.

सर्व पदार्थ उत्कृष्ट गुणवत्तेच्या मालापासून प्रत्यक्ष ग्राहकांसमोर तयार करून दिले जातात. ताजा फराळ अतिशय स्वच्छ, हायजेनिक वातावरणात तयार करून दिला जात असल्याने ग्राहकांना खरेदी करताना पूर्ण समाधान मिळते.

सर्वसामान्यांपासून अनेक दिग्गजांनी गौरवलेल्या केटरर्सच्या दिवाळी फराळाला विविध कारखाने, शैक्षणिक संस्था, कामगार संघटना, शासकीय विभागाकडून मोठी मागणी असते. दिवाळीत शुभेच्छा संदेशासह हेमराज केटरर्सचे आकर्षक पॅकिंग असलेले दिवाळी फराळ बॉक्स दिले जातात. नगर शहर व जिल्हयाबरोबरच राज्याच्या विविध भागातून हेमराज दिवाळी फराळाची ऑर्डर आधीच नोंदवण्यात येते. हेमराज बोरा यांची मुले विश्वजीत व प्रसन्न बोरा या व्यवसायात योगदान देत आहेत. दिवाळी फराळातील नमकीन पदार्थांसाठीचे मसाले हेमराज यांच्या पत्नी शिलाताई बोरा स्वत: तयार करतात. सूनबाई मयुरी बोरा यासुद्धा फराळ तयार करण्याच्या कामावर देखरेख ठेवून असतात.

फराळाच्या ऑर्डरसाठी ग्राहकांनी विश्वजीत बोरा (मो. ९९२१५९९२१६, ९८९०२९८८९९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ग्राहकांनी फराळ खरेदीसाठी येताना कापडी पिशवी सोबत आणावी, असे आवाहनही हेमराज केटरर्सतर्फे करण्यात आले आहे.

# तृतीयपंथीयाला जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्यावर ॲट्रोसिटीचा गुन्हा दाखल व्हावा

### जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन, मंगळवारपासून उपोषण करण्याचा इशारा

नगर – शहरातील रामवाडी भागात राहत असलेल्या तृतीयपंथीय व्यक्तीला जातीवाचक शिवीगाळ करुन हिनतेची वागणुक देणाऱ्या मंगलगेट येथील त्या व्यक्तीवर ॲट्रोसिटी ॲक्टप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) महिला आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.



तृतीयपंथीयाला जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्यांवर ॲट्रोसिटीचा गुन्हा दाखल व्हावा अशा आशयाचे निवेदन पोलिस अधीक्षकांना देऊन उपोषण करण्याचा इशारा देणारे धनवर्षा साळवे व शिष्टमंडळातील सदस्य

या मागणीसाठी शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले. यावेळी महिला आघाडीच्या शहराध्यक्षा धनवर्षा साळवे, सुनिता साळवे, रेखा दाभाडे, तेजस्विनी साळवे, श्रद्धा पातकळ, मंगल बडेकर, संपदा म्हस्के, शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, अविनाश कांबळे आदी उपस्थित होते. सदर प्रकरणी गुन्हा दाखल न झाल्यास मंगळवारी (दि.२२ ऑक्टोबर) पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. सदर प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षकांना तक्रार अर्ज देऊन देखील संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याने महिला आघाडीच्या वतीने उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.



माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून पेमराज सारडा महाविद्यालयाच्या ग्रंथपाल विभागात साजरा करताना त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित, आदी.

# पेमराज सारडा महाविद्यालय ग्रंथालय विभागात 'वाचन प्रेरणा दिन' साजरा

नगर – पेमराज सारडा महाविद्यालय, ग्रंथालय विभागात भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन 'वाचन प्रेरणा दिन' झाला.

१५ ऑक्टोबर हा डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन पेमराज सारडा महाविद्यालय ग्रंथालय विभागात 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा झाला. कार्यक्रमाची सुरवात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित व इतर प्राध्यापकांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून झाला. या कार्यक्रमासाठी ग्रंथालय विभागात आलेल्या सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक वर्ग आणि विद्यार्थी यांचे ग्रंथालय विभागाच्या वतीने स्वागत करण्यात आले.

डॉ. माहेश्वरी गावित यांनी वाचनाचे वैयक्तिक आणि सामाजिक जीवनातील महत्त्वाचे स्थान, ज्ञान संपन्न आणि माहिती समृद्ध समाज घडवण्यासाठी वाचन संस्कृतीचे जतन केले पाहिजे. तसेच व्यक्तिमत्त्व विकास आणि भाषा विकासासाठी विद्यार्थ्यामध्ये तसेच समाजातील विविध घटकामध्ये वाचनाची आवड निर्माण केली पाहिजे. तामिळनाडूमधील रामेश्वर या छोट्या धर्मक्षेत्री एका नावाड्याच्या पोटी १९३१ मध्ये जन्मलेला हा मुलगा म्हणजेच देशातील 'भारतरत्न' हा सर्वोच नागरी सन्मान मिळवणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम.

ग्रंथालय समितीचे चेअरमन प्रा. मिलिंद देशपांडे यांनी मनोगतातून वाचन संस्कृतीचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमासाठी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. राजेंद्र मारवाडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.शैलेश निकम यांनी केले. आभार बाबासाहेब दरंदले यांनी मानले.

# जनतेच्या आशीर्वाद व विश्वासाच्या बळावरच आ.संग्राम जगताप पुन्हा निवडणूक रिंगणात

### माजी आमदार अरुण जगताप यांचे प्रतिपादन, शहरातील मेहतर समाजातील नागरिकांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

नगर – नगर शहराची अवस्था बदलत कोट्यवधी रुपयांच्या विकास कामांच्या माध्यमातून आ.संग्राम जगताप यांनी शहराला वेगाने विकासाच्या वाटेवर नेले आहे. केलेल्या विकास कामांच्या मुद्यावरच आ.संग्राम जगताप हे तिसऱ्यांदा विधानसभा लढवत आहेत. शहराच्या विकासाबरोबरच शहरातील सर्व स्तरातील जनतेचे प्रश्न सोडवण्यास आ.जगतापांनी प्राधान्य दिले आहे. त्यामुळे सर्व जनतेच्या आशीर्वादाच्या व विश्वासाच्या बळावरच ते पुन्हा निवडणूक रिंगणात उतरले आहेत. मेहतर समाजातील नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून आ.जगतापांचे हात बळकट केले आहेत.



शहरातील विविध भागांमधील मेहतर वाल्मिकी समाजातील शेकडो महिला व नागरिकांचे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षात स्वागत करताना माजी आमदार अरुण जगताप.

अरुण जगताप म्हणाले, आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली शहरातील नालेगाव, भिंगार, वसंत टेकडी, सिद्धार्थनगर, सावेडी, पाईपलाईन रोडसह विविध भागांमधील वाल्मिकी मेहतर समाजातील शेकडो महिला व नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षात मध्ये प्रवेश केला. माजी आमदार अरुण जगताप यांनी पक्षाचे उपरणे घालून सर्वांचे पक्षात स्वागत केले. यावेळी विश्वास जुना...संग्राम भैय्या पुन्हा... अशा घोषणा देण्यात आल्या.

यावेळी मुन्नाबाई चावरे यांनी मनोगत व्यक्त करतना सांगितले की, अहिल्यानगर शहरात आ.संग्राम जगताप यांनी जी विकास कामे केली आहेत एवढे विकास कामे याधी कोणीही कधीच केली नाहीयेत. त्यामुळे त्यांनी केलेल्या विकास कामांनी आम्ही प्रभावित झालो आहोत. आ.जगतापांनी मेहतर समाजाच्याचेही अनेक प्रश्न सोडवले आहेत. त्यामुळेच त्यांना मेहतर समाज पाठिंबा देत आहोत.

यावेळी नागरिकांनी आ.संग्राम जगताप यांनी मेहतर समाजाचे अनेक प्रश्न मार्गी लावल्या बद्दल आभार मानले. तसेच भिंगार शहरात वाल्मिकी प्रवेशद्वार मंजूर केल्याबद्दलही आ.जगताप यांचे आभार मानले.

यावेळी मेहतर समाजाचे अनिल तेजी, बिल्लू घावरी, पै.लक्ष्मण सारसर, पै.अनिल वाणे, शक्ती सोहत्रे, राजेश सोहत्रे, संदीप करोलीया, तुषार करोलीया, गौरव चावरे, रवी मोरकरोसे, किशोर माने, अनुप चव्हाण, जगदीश कुडिया, मुन्नाबाई चावरे आदींच्या नेतृत्वाखाली शेकडो मेहतर समाजातील कार्यकर्त्यांनी व महिलांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

या कार्यक्रमास छावणी परिषदेचे माजी उपाध्यक्ष संभाजी भिंगारदिवे, प्रवीण घावरी, प्रमोद आठवल, विशाल झुंज, शुभम टाक, रवी गोहेर, राजेश तेजी, रोहित बागडी, सनी खरारे, सचिन बागडी, मनोज बागडी, करण वाणे, हर्षल सारसर, श्रीराज चव्हाण, संदीप लखन, टिंकू चव्हाण, सुमित गोहेल, रितेश निधाने, आशिष तेजी, आकाश करोलीया, बाबासाहेब सारसर आदी उपस्थित होते.

मयूर बांगर यांनी प्रास्ताविक केले तर विशाल बेलपावर यांनी आभार मानले.

# भारतीय संस्कृती, एकत्र कुटुंब पद्धत व नारी शक्तीमुळेच हिंदू संस्कृती टिकून

## सुरेश चव्हाणके यांचे प्रतिपादन; महिला भजनी मंडळ व महिला नवरात्र उत्सव मंडळांचा विचार भारतीच्या वतीने सन्मान

नगर – हजारो वर्षांपासून हिंदू संस्कृतीवर चहुबाजूंनी आक्रमणे होत आहेत. तरीही ही संस्कृती टिकून आहे याला कारण सर्वश्रेष्ठ असलेली आपली भारतीय संस्कृती, एकत्र कुटुंब पद्धत व नारी शक्ती आहे. पण सध्याची पिढी ही संस्कृती विसरत चालले आहेत. त्यामुळे भरकटलेल्या नव्या पिढीला वाचवण्यासाठी त्यांना पुन्हा भारतीय संकृतीकडे वळवून महत्व पटवून देणे आवश्यक आहे. याची सुरवात आपल्या घरापासून करा, असे प्रतिपादन हिंदुत्ववादी नेते सुरेश चव्हाणके यांनी केले.



विचार भारतीच्या वतीने आयोजित जनजागृतीपर प्रबोधनात्मक प्रवचनांचा समारोपाच्या कार्यक्रमास उपस्थित भजनी मंडळ व नवरात्र मंडळांच्या महिलांना मार्गदर्शन करताना हिंदुत्ववादी नेते सुरेश चव्हाणके.

अहिल्यानगरीत समाज प्रबोधन व विचारील परिवर्तनासाठी काम करणाऱ्या विचार भारती या सामजिक संस्थेच्या वतीने नुकत्याच झालेल्या नवरात्रोत्सवात जागर मातृशक्तीचा उपक्रमांतर्गत शहरात ९ दिवस विविध ठिकाणी महिला सुरक्षिततेसाठी हभप ॲड.राजश्री कडलग महाराज यांचे जनजागृतीपर प्रबोधनात्मक प्रवचनांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रवचनांचा समारोपा निमित्त आयोजित कार्यक्रमात सुरेश चव्हाणके यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख पाहुण्या लीला बायड, उद्योजिका सुमंगल मुनोत, किरण रवींद्र बारस्कर, हभप ॲड.राजश्री कडलग महाराज यांच्यासह महिला उपस्थित होत्या. या कार्यक्रमात शहरातील ४१ महिला भजनी मंडळ व १० नवरात्र उत्सव महिला मंडळांना सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

सुरेश चव्हाणके पुढे म्हणाले, महिलांच्या भजनी मंडळांच्या माध्यमातून हिंदू धर्म व अध्यात्म जिवंत ठेवण्याचे महान काम होत आहे. सर्व धर्मांमध्ये नारीशक्तीचा जागर केवळ हिंदू धर्मातच होतो. कारण इतर धर्मामध्ये नारींना दुय्यम स्थान आहे. अशा नारी शक्तींचा सन्मान करण्याचा स्तुत्य उपक्रम विचार भारतीने राबवला आहे.

प्रास्ताविकात प्रा.ऐश्वर्या सागडे यांनी विचार भारतीच्या सामाजिक व प्रबोधनात्मक कार्याची माहिती देवून जागर मातृ शक्तीचा या समाज प्रबोधनात्मक प्रवचन उपक्रमाची माहिती दिली. रुपाली मोहिते यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. सूत्रसंचालन मधुमती निळेकर यांनी केले, तर आभार भावना लांडगे यांनी मानले. मनीषा मुळे व मंदाकिनी गायकवाड यांनी पाहुण्यांचा सन्मान केला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगीता पाचे, माया वाकळे, सरला वाकळे, शीतल उंडे, सौ. शितोळे आदींनी परिश्रम घेतले. तसेच रवींद्र बारस्कर, सुधीर लांडगे, अशोक गायकवाड, उदय भणगे, अनिल मोहिते, सुनील नागोरी यांनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात सहकार्य केले.



डॉ.वैष्णवी विजय भांबरकर प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल डॉ.धीरज शेटे मेमोरियल अवॉर्ड २०२३–२४ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# डॉ.विठ्ठलराव विखे पा.फाउंडेशनच्या कालेज ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयात डॉ. वैष्णवी भांबरकर प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण

नगर – विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन कॉलेज ऑफ फिजिओथेरपी अ.नगर या महाविद्यालयात कम्युनिटी फिजिओथेरपी या विषयात डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कालेज ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयात डॉ.वैष्णवी विजय भांबरकर प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल डॉ.धीरज शेटे मेमोरियल अवॉर्ड २०२३–२४ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी डॉ.सुनिल म्हस्के, डॉ.आर.के.पडळकर, डॉ.अरुण त्यागी आदी उपस्थित होते. तसेच डॉ.वैष्णवी भांबरकर यांना बॅचलर ऑफ फिजिओथेरपी ही पदवी प्रदान करण्यात आली.

कु.वैष्णवी भांबरकर हिला कॉलेजचे प्राचार्य डॉ. श्याम गणवीर, उपप्राचार्य डॉ. सुवर्णा गणवीर, डॉ.अभिजीत दिवटे व इतर प्राध्यापकांनी उत्तम मार्गदर्शन केले आहे.

डॉ.वैष्णवी विजय भांबरकर यांच्या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.



आयएमएस–सीडसीचे दिवाळी प्रदर्शनाचे फित कापून उद्घाटन करताना उद्योजिका मधुबाला चोरडिया. समवेत संस्थेचे संचालक डॉ. एम.बी. मेहता आदी.

# आयएमएस–सीडसीचे दिवाळी प्रदर्शन छोट्या व्यावसायिकांसाठी प्रेरणादायी

## मधुबाला चोरडिया यांचे प्रतिपादन

नगर – आयएमएस–सीडसीचे दिवाळी प्रदर्शन छोट्या व्यावसाईकांसाठी उपयुक्त आणि प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन उद्योजिका मधुबाला चोरडिया यांनी केले.

दिवाळी प्रदर्शनाचे उद्घाटन चोरडिया यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी संस्थेचे संचालक डॉ. एम बी मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, जितो महिला विभाग अध्यक्षा मेघना मुनोत, सीड सीच्या समन्वयक डॉ. ऋचा तांदूळवाडकर, प्रा. गौरी पाटील शिक्षक, सर्व स्टॉल धारक उपस्थित होते.

आयएमएस सीड सी मागील काही वर्षापासून नगर जिल्ह्यातील महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने काम करत आहे. यात महिलांसाठी कार्यशाळा, मार्गदर्शन व त्यांच्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री असे उपक्रम राबवीत आहे.

महिलांना एक उत्तम व्यासपीठ मिळवून देण्यासाठीचा भाग म्हणून दिवाळी सणानिमित्ताने महिलांनी तयार केलेले खाद्य पदार्थ, कपडे, ज्वेलरी, आयुर्वेदिक उत्पादने, मसाले यांचे प्रदर्शन व विक्री नगर येथील कोहिनूर मंगल कार्यालय सावेडी येथे २२ व २३ ऑक्टोबला आहे.

माहितीसाठी या उपक्रमाच्या समन्वयक डॉ. ऋचा तांदूळवाडकर यांच्याशी ९८५०३७०१४१ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी केले आहे.

# भजन कसे गायचं यांची बालवाडी म्हणजे भजन स्पर्धा

## ह. भ. प. भागवताचार्य श्रीकृष्ण महाराज रायकर यांचे प्रतिपादन : हरिपुष्प फाउंडेशन आयोजित हरीपुष्प करडंक भजनी मंडळ स्पर्धेत ६० भजनी मंडळाचा सहभाग

नगर – भजन म्हणताना ते आपल्यासाठी गायचे, स्पर्धेसाठी नाही तर देवासाठी करायचं कसं, ते कसं गायचं त्याची पहिली बालवाडी म्हणजे ही भजना स्पर्धा आहे, असे प्रतिपादन आळंदी देवाची वारकरी शिक्षण संस्थेचे ह.भ.प. भागवताचार्य श्रीकृष्ण महाराज रायकर यांनी केले.



हरिपुष्प फाउंडेशन आयोजित हरिपुष्प करंडक भजनी मंडळाच्या स्पर्धेचे उद्घाटन माजी आमदार अरूण जगताप व मंदारबुवा रामदासी यांच्या हस्ते करण्यात आले. (छाया – उदय जोशी)

हरिपुष्प फाउंडेशन आयोजित हरिपुष्प करंडक भजनी मंडळाच्या स्पर्धेचे उद्घाटन आमदार अरूण जगताप व मंदारबुवा रामदासी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पार्वती जगताप, आयोजक हरिपुष्पा फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष गणेश गोंडाळ, सुमित कुलकर्णी, रेश्मा आठरे, रंजना उर्कीडे, शालिनी राठोड, ह. भ. प. रामायणाचार्य रविंद्र महाराज आव्हाड वडुलकर, जयश्री मगर, मयुरी गोरे, नगरसेवक प्रकाश भागानगरे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आळंदी देवाची वारकरी शिक्षण संस्थेचे ह. भ. प. भागवताचार्य श्रीकृष्ण महाराज रायकर हे होते. ही स्पर्धा नगर–मनमाड रोडवरील, माऊली संकुलात झाली. प्रथमत प्रभू श्रीराम व स्व. पुष्पा हरिभाऊ गोंडाळ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलन करण्यात आले.

ह. भ. प. भागवताचार्य श्रीकृष्ण महाराज रायकर म्हणाले सात्विक कार्यक्रमात आपली संस्कृती जोपासली पाहिजे संस्कार रुजवण्याचं काम जर कुठे होत असेल तर या भजनी मंडळामध्ये होते त्यांना पहिल्यांदा व्यासपीठ मिळाले आहे देव भावाचा भुकेला आहे तो भाव जर आपण ठेवला तर निश्चित भजनाने तो भगवान परमात्मा मिळणार आहे.

मंदारबुवा रामदासी म्हणाले की हिंदू संस्कृतीमध्ये स्त्री ही आदीशक्तीचे रूप मानले जाते धर्म टिकवण्याचे काम स्त्री व मातृशक्ती केले आहे धर्म संस्कृती परंपराचे दायित्व ही मातृशक्ती निभावते त्यांचे दर्शन म्हणजे हा कार्यक्रम आहे धार्मिक कार्यक्रमाची परंपरा जगताप परीवारांने कायम चालू आहे. भजन मंडळाच्या माध्यमातून भंगवंताची सेवा करत आहेत. गोंडाळ परीवाराने फार मोठे पुण्याचे काम हाती घेतले आहे. या परीवाराच्या पाठीशी अरूण जगताप व जगताप परीवार समर्थपणे उभा आहे. सुमीत कुलकर्णीच्या माध्यमातून भजनी मंडळाना हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे

ह. भ. प. रामायणाचार्य रविंद्र महाराज आव्हाड वडुलकर म्हणाले की जगताप परीवारांनी नगरमधील कलाकारांना अनेक स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ मिळवून दिलं.

प्रास्ताविकात सुमित कुलकर्णी संस्कृती, वारसा या माध्यमातून नव्या पिढीपर्यत पोहचवण्याचे काम आम्ही करत आहोत. गोंडाळकर व जगताप परीवाराचे याकरीता सहकार्य आहे. अश्या सहकार्यामुळे या स्पर्धा होतात. ही स्पर्धा दरवर्षी घेणार आहोत.

या स्पर्धेचे परीक्षण संगीता देऊळगावकर, अनुजा कुलकर्णी यांनी केले.

हरी तुझ्या मुरलीने सारे मन मोहीले माझे, माझा गिरीधर का रुसला, ज्ञानोबा तुकाराम माऊली, घागर घेऊन घागर घेऊन निघाली पाण्या गवळण, कृष्णाची गवळण अशी विविध भजने सादर करत भजनी मंडळाने भक्ती पूर्ण वातावरण निर्मिती केली होती, प्रत्येक भजनी मंडळाची तल्लीनता तसेच एक सारखी वेशभूषा, त्यामुळे वातावरण भक्ती रसात चिंब झाले होते.



**माऊंट सनाय कॉन्व्हेंट स्कूलचे रंगोत्सव सेलिब्रेशनच्या राष्ट्रीय स्पर्धेत यश** सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेंट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मुंबई येथील रंगोत्सव सेलिब्रेशन या संस्थेने आयोजित केलेल्या राष्ट्रीय पातळीवरील रंगभरण व हस्ताक्षर स्पर्धेत स्पृहणीय यश संपादन केले. इयत्ता चौथीच्या रुद्र गुंड ह्याने रंगभरण स्पर्धेत द्वितीय क्रमांक तर इयत्ता सहावीच्या रेवा घुसळे हीने हस्ताक्षर स्पर्धेत चतुर्थ क्रमांक पटकावला. त्याचप्रमाणे अली शेख, अमानत शेख, अथर्व बारूडे, अक्षदा हजारे, दक्ष चौधरी, आयूष बेरड, पूर्वा बोरूडे, अरिबा सय्यद, श्रुती चव्हाण, कार्तीक लांडगे व सुष्टी पोकळे यांना विषेश पारितोषिके तर उर्वरित ६१ विद्यार्थ्यांना सुवर्ण व रौप्य पदके प्राप्त झाली. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांसह मुख्याध्यापिका जयश्री खरात.

### शहीद अश्फाकुल्ला खान व बहादूर शाह जफर जयंतीनिमित्त

# अलकरमतर्फे २४ ऑक्टोबरला मोफत रक्तगट व शुगर तपासणी





नगर – अल करम हॉस्पिटलच्या वतीने शहीद अशफाकुल्ला खान व स्वतंत्रता सेनानी बहादूर शाह जफर यांच्या जयंतीनिमित्त २४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते दुपारी१ वाजेपर्यंत अलकरम हॉस्पिटल इंगळे मेडिकलच्या मागे किंग्स गेट रोड रामचंद्र खुंट अहमदनगर येथे मोफत रक्तगट तपासणी व शुगर तपासणी केली जाणार असल्याचे आयोजक तौफिक तांबोळी यांनी सांगितले.

याचा गरजूंनी लाभ घ्यावा असे आवाहन शेर अली शेख यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९८ ६० ७० ८० १६ या नंबर वर संपर्क करावे.

# ‘वेटलिफ्टिंग’मध्ये प्रगत विद्यालयाचा श्रेयस गाडे पुणे विभागात प्रथम

## यश कदम यांची पिप साईड रायफल शुटिंग स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम





नगर – अहिल्यानगर जिल्हा क्रीडा विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेत येथील प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे इयत्ता बारावी विज्ञान शाखेत शिकणारा चि. श्रेयस गाडे या विद्यार्थ्यांची वेटलिफ्टिंग स्पर्धेत विभागात प्रथम आला त्याने डिव्हिजन ६७ किलो वजन वयोगट १९ वर्षांमध्ये विभागात प्रथम येण्याचा मान मिळवला त्याची आठ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या राज्याच्या स्पर्धेसाठी निवड झाली.

तर विद्यालयातील चि. यश राहुल कदम याने नगर जिल्हास्तरीय पिप रायफल शूटिंग स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला व त्याची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या दोन्ही विद्यार्थ्यांना क्रिडा शिक्षक दिलीप रोकडे यांचे मार्गदर्शन लाभले.

संस्थेचे अध्यक्ष श्रीमती विजया रेखे, उपाध्यक्ष चंद्रशेखर वाल्मीक कुलकर्णी, प्रगत विद्यालयाचे चेअरमन उमेश रेखे, कार्यकारणी सदस्य किरण वैकर, महेश रेखे, उदयकुमार भणगे, माजी अध्यक्ष दि.ना. जोशी, विद्यालयाचे प्राचार्य सुनील पंडित, प्राथमिक च्या मुख्याध्यापिका प्रतिभा धरम, प्रा. देशमुख हर्षाली, विजय गरड, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे आदींनी अभिनंदन केले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# वाचनामुळे इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान, भविष्याचा वेध घेता येतो

## डॉ. रेखाराणी खुराणा यांचे प्रतिपादन; डॉ.पाऊलबुधे फार्मसी कॉलेजमध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा

नगर – मिसाईल मॅन म्हणून आपल्या भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची वेगळी ओळख संपूर्ण जगाला आहे. त्यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे. याचा विसर आपल्याला पडला आहे. वाचनामुळे इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे वाचन आहे. असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. रेखाराणी खुराणा यांनी केले.



वसंत टेकडी येथे डॉ. ना.ज.पाउलबुधे कॉलेज ऑफ फार्मसीत माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्या डॉ. रेखाराणी खुराणा, डॉ. श्याम पांगा, डॉ. वेणु कोला, अनुराधा चव्हाण, स्वाती कडनोर शिक्षक वृंद आदी (छाया – विजय मते)

वसंत टेकडी येथील डॉ. ना.ज. पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्या डॉ. रेखा राणी खुराणा बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. श्याम पांगा डी. फार्मसी च्या प्राचार्या अनुराधा चव्हाण डॉ. वेणु कोला शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. खुराणा पुढे म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी सातत्याने वाचन करावे त्यामुळे आपले ग्रहण क्षमता आणि स्मरणशक्ती अधिकाधिक सशक्त होऊन बुद्धिमत्ता प्रगल्भ होते. यामुळे माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. त्यामुळे वाचनाला सर्वांनी महत्त्व दिले पाहिजे.

यावेळी प्राचार्य डॉ. श्याम पांगा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनाचा प्रवास उलगडला. लायब्ररी प्रमुख स्वाती कडनोर यांनी विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त वाचन करून आपल्या ज्ञानात भर टाकण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.वेणु कोला यांनी केले तर स्वाती कडनोर यांनी आभार मानले.

# संत बुवाजी बुवा संजीवन समाधी सोहळा स्मृती निमित्त कार्यक्रम

## अरणगाव (मेहराबाद) मंदिरात सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायणास प्रारंभ

नगर – नगरजवळील अरणगाव (मेहराबाद) येथील श्री संत बुवाजी बुवा महाराज मंदिरात आषाडी एकादशीचा उपवास सोडण्यासाठी द्वादशीला साक्षात पांडुरंग येतात अशी आख्यायिका असलेल्या संत बुवाजी बुवा संजीवन समाधी सोहळा निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून मंदिरात सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण प्रारंभ १८ ऑक्टोबर पासून झाला आहे. तो २५ ऑक्टोबर या कालावधीत होत आहे.





बुवाजी बुवा समाधी मंदिर व ज्ञानेश्वरी परायणाला बसलेले भाविक

श्री अरण्येश्वराच्या पुण्यवान भूमीमध्ये ज्यांच्या भेटीसाठी स्वतः पांडुरंग परमात्मा स्वतःधावत येवून आषाढ शुद्ध द्वादशीस पारणे सोडतात व ज्यांना संजीवन समाधी देतात त्या संत बुवाजीबुवा महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळा २५ ऑक्टोबर रोजी आहे. त्यापित्यर्थ अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा श्री पांडुरंग बुवाजी बुवा समाधी देवस्थान ट्रस्ट यांच्या सौजन्याने आयोजित केला आहे.

संजीवन समाधी सोहळा स्मृती निम्मित सप्ताह, अखंड हरीनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा प्रारंभ झाला असून, १८ ऑक्टोबरपासून दैनंदिन कार्यक्रम सुरु झाले असून काकडा भजन पहाटे ४ ते ६,सकाळी ७ वा विष्णु सहस्त्रनाम, सकाळी ७.३० ते ११.३० ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ४ ते ५ प्रवचन, ५ ते ६.३० हरिपाठ ६.३० ते ७ आरती, रात्री ८.३० ते १०.३० कीर्तन होत आहे, हरिभाऊ महाराज भोदे, अमोल महाराज सातपुते, माधव महाराज कोरे यांचे कीर्तन झाले असून योगेश महाराज खेंडके, प्रसाद महाराज गडदे, हवसराव महाराज मगर, मनोहर महाराज शिनारे यांचे कीर्तन होणार आहे

२५ ऑक्टोबरला पहाटे ५ वा.अभिषेक व समाधीची महापुजा व सकाळी १० ते १२ या वेळेत जंगले महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. सर्व कार्यक्रमाचे आयोजन श्री पांडुरंग बुवाजीबुवा समाधी देवस्थान ट्रस्ट, अरणगाव व पंचक्रोशीतील समस्त ग्रामस्थ अरणगाव हे करत आहेत. सर्व कार्यक्रमाला भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



चित्रपट अभिनेत्री व भारतातील एकमेव मिसेस वर्ल्ड डॉ. आदिती गोवित्रीकर यांनी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या शांतिवन मधील ओम् शांति मीडिया कार्यालयाला भेट दिली. यावेळी मुख्य संस्थापक बी के डॉ. गंगाधर भाई यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी बी के डॉ. दीपक हरके आदी.




## फंडू एसएमएस

हम किसीको मजबूर नही करते
की हमसे प्यार करे,
लेकिन पर्सनॅलिटीही ऐसी है की
हर कोई खिंचा चला आता है।

हर नई चीझ अच्छी
होती है लेकिन हर
दोस्त पुरानाही अच्छा
होता है।

व्हेन यू चूझ टू
स्माईल,
यू बीकम मास्टर
ऑफ युवर इमोशन

## मला असुरक्षित वाटतंय...

**लाईफ गुरू**



मी ३० वर्षांचा तरूण आहे. नाकी, डोळी निटस आणि दिसायला चांगला आहे. मी रिलेशनशीपमध्ये होतो पण प्रत्येक वेळी मी रूपाने डाव्या असलेल्या मुलीच्या प्रेमात पडलो. एखाद्या सुंदर मुलीच्या प्रेमात पडण्याचा विचारच मी करू शकत नाही. रूपाने सर्वसाधारण असलेल्या मुलींसोबतच माझं नातं जुळतं. सुंदर मुलीच्या प्रेमात पडल्याने मला खूपच असुरक्षित वाटतं. असं का होत असावं?

– सर्वात आधी तून स्वत:ला समजून घेण्याचा प्रयत्न कर. तू स्वत:ला जाणत नाहीस तोपर्यंत इतरांकडून तुला ही अपेक्षा करता येणार नाही. तू स्वत: रूपाने सर्वसाधारण असला असतास तरी सुंदर मुलींशी मैत्री करू शकला असता. स्वत:बद्दल मनात चांगले विचार आण. स्वत:ला कमी लेखू नको. स्वत:चा आदर करायला शिक. मगच इतरही तुझा आदर करू लागतील. तुझ्यात आत्मविश्वासाचा अभाव आहे असं वाटतं. याचा फायदा इतर मंडळी घेतात. आत्मविश्वास नसलेल्या व्यक्तींना इतर लोक फार गंभीरपणे घेत नाहीत. त्यामुळे सर्वात आधी तू स्वत:ला गंभीरपणे घे. बाह्यरूप खुलवताना अंर्तमनाचाही विचार कर. मनातले विचार खुलव. स्वत:बद्दल चांगला विचार कर. यामुळे तुला बरं वाटेल.

## सौरउर्जेच्या वापरासाठी...

**अचिव्हर**

**पेट्रोल, डिझेल, खनिज तेल हे इंधनाचे साठे मर्यादित आहे. येत्या काही वर्षांमध्ये हे साठे संपणार आहेत. त्यामुळे आपल्याला अपारंपरिक ऊर्जेकडे वळायला हवं. सौरऊर्जा, पवनऊर्जा यांच्या वापराबाबत जनजागृती करायला हवी. तरच भविष्यातल्या इंधनाची गरज भागू शकेल. लक्षेय सहगल हा तरूणही हेच करतोय.**

लक्षेय सहगलला कायमच सौरऊर्जेच्या क्षेत्रात काम करायचं होतं. पाँडिचेरी विद्यापीठातून त्याने अपारंपरिक ऊर्जा तंत्रज्ञानात मास्टर्स पदवी मिळवली. सौर ऊर्जा ही काळाची गरज आहे, हे त्याने ओळखलं होतं. त्यामुळे या क्षेत्रासाठी काही तरी करण्याची इच्छा त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्याने याच क्षेत्रातील विविध कंपन्यांमध्ये काम केलं. या अनुभवामुळे त्याला नवी कल्पना सुचली. या क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची कमतरता असल्याचं जाणवलं. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि सौरऊर्जेशी संबंधित उत्पादनं बसवण्याचं कसब लोकांमध्ये नव्हतं. एकीकडे अशी परिस्थिती असताना दुसरीकडे सरकारकडून या क्षेत्रासाठी प्रोत्साहन दिलं जात होतं. शहरी तसंच ग्रामीण भागात सौरऊर्जेचा वापर वाढावा, यासाठी प्रयत्न केले जात होते. त्यामुळे सौरऊर्जेची मागणी वाढू लागली होती.

या क्षेत्रात खाजगी कंपन्यांनी हातपाय पसरायला सुरूवात केली. पण प्रत्यक्षात हे सगळं चुकीच्या पद्धतीने होत असल्याचं लक्षेयला जाणवू लागलं.

सौरऊर्जेच्या क्षेत्रात पुढे जायचं असेल तर उद्योगपतींना योग्य प्रशिक्षण देणं गरजेचं असल्याचं त्याचं म्हणणं होतं. यातूनच त्याने 'स्पेक्ट्रॉन सोलर प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीची स्थापना केली. सौरऊर्जेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या लघुउद्योजकांना त्याची कंपनी प्रशिक्षण देते, या क्षेत्रातल्या खाचाखोचा समजावून सांगते. एक उद्योजक म्हणून सौरउर्जेच्या वेगवेगळ्या क्षेत्रात काम



बसवून देण्याच्या क्षेत्रात तुम्ही काम करू शकता. सोलर इंस्टॉलर म्हणून काम करताना अडचणी येतात. वेगवेगळ्या कंपन्यांकडून उत्पादनं विकत घेऊन घरं तसंच कारखान्यांमध्ये बसवायची असतात. या प्रक्रियेत अनेक चुका होऊ शकतात. यंदा जुलैमध्ये लक्ष्ययने ही कंपनी सुरू केली. त्यांची चारजणांची टीम आहे. या क्षेत्रात काम करण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. सौरऊर्जेचा वापर योग्य पद्धतीने व्हावा, असा त्यांचा प्रयत्न आहे. या प्रशिक्षणामुळे उद्योजकांचे पैसे वाचतात. लक्ष्यय आणि त्याच्या टिमला छोट्या शहरांमध्ये काम करायचं आहे. अमृतसर, जालंधर, त्रिपुरा, गुवाहाटीसारख्या ठिकाणी त्यांना हातपाय पसरायचे आहेत. त्यांच्या प्रयत्नांनी सौरऊर्जेचा वापर वाढला तर भविष्याच्या दृष्टीने ही बाब सकारात्मक ठरणार आहे.

## सौंदर्याची न्यारी दुनिया...

**फ्युचर ऑप्शन**

**व्यक्तिमत्त्व खुलवण्यावर प्रत्येकाचा भर असतो. बाह्य रूपही तितकंच महत्त्वाचं मानलं जातंय. व्यक्तिमत्त्वावरून माणसाची ओळख निर्माण होते. त्यामुळे सौंदर्यतज्ज्ञांसाठी सध्याचा काळ सुगीचा मानला जातोय. या क्षेत्रात मुलं आणि मुलींना समान संधी आहेत. म्हणूनच करीअरची वाट म्हणून या क्षेत्राचा विचार करता येईल. सौंदर्याच्या क्षेत्राचा विस्तार प्रचंड आहे. तुमच्या आवडीनुसार एका क्षेत्राची निवड करता येईल.**

ब्युटिशियनचा कोर्स करून सौंदर्यतज्ज्ञ म्हणून काम करता येईल. वॅक्सिंग, फेशिअल, हेअर कट, मेनिक्युअर, मसाज यात कौशल्य मिळवून तुम्ही करीअरची सुरूवात करू शकता. भविष्यात स्वत:चं पार्लर किंवा सलूनही काढता येऊ शकेल. युनिसेक्स सलूनचा ट्रेंडही जोरात आहे.

✻ केस कापण्यासोबतच त्यांच्या स्टायलिंगची जबाबदारी हेअर स्टायलिस्टवर असते. कुणाला कोणता हेअर कट चांगला दिसेल इथपासून कोणती स्टाईल करायची हे हेअर स्टायलिस्ट ठरवतो.

✻ मेक अप आर्टिस्ट म्हणून मनोरंजनाच्या क्षेत्रात नाव कमावता येईल.



✻ फेशिअल तज्ज्ञ हे सुद्धा नवं क्षेत्र आहे. आजच्या जमान्यात लोकांना त्वचेच्या समस्या भेडसावताना दिसतात. या समस्यांवर उपाय सुचवून फेशिअलद्वारे त्यावर उपचारही करता येतील.

✻ कॉस्मेटिक्स सेल्सपर्सन म्हणूनही तुम्ही काम करू शकता.

✻ सौंदर्याच्या क्षेत्राशी संबंधित अभ्यासक्रम सहा ते बारा महिन्यांचे असतात. अनेक संस्थांमध्ये हे अभ्यासक्रम शिकवले जातात. कॉस्मेटॉलॉजी किंवा मेक अपमध्ये डिप्लोमा कोर्स करता येऊ शकतो. या क्षेत्रातल्या तज्ज्ञ मंडळींकडेही तुम्हाला शिकता येईल. अनुभव आणि कौशल्य यांच्या जोरावर तुम्ही चांगलं उत्पन्न मिळवू शकता.

## स्ट्रोक टाळायचा तर...

**युवा आरोग्य**

**तरूण वयातल्या विकारांचं प्रमाण बरंच वाढलंय. मधुमेह, उच्च रक्तदाबापासून हृदयविकारापर्यंत अनेक समस्यांनी युवकांना घेरलंय. या विकारांपैकी एक म्हणजे स्ट्रोक. ताणतणाव, धावपळ आणि प्रचंड स्पर्धा यामुळे युवावर्गात स्ट्रोक येण्याच्या प्रमाणात बरीच वाढ झाल्याचं पहायला मिळतंय. स्ट्रोकपासून बचाव करण्याच्या काही उपायांबाबत...**

स्ट्रोकसारखे विकार टाळण्यासाठी काम आणि दैनंदिन आयुष्य यांचा ताळमेळ साधणं गरजेचं आहे. यासाठी तुमच्या जीवनशैलीत काही सकारात्मक बदल केले गेले पाहिजेत. तुमच्या योजना आखा. पण या योजना प्रत्यक्षात आणता आल्या पाहिजेत. व्यायामाचं नियोजन करा. किती व्यायाम करू शकता, हे जाणून घ्या. वास्तववादी उद्दीष्ट ठेवा.



✻ चुकीची जीवनशैली बदलण्यासाठी काही वेळ दिला पाहिजे. वाईट सवयी लगेच जाणार नाहीत. त्यामुळे एका सवयीवर लक्ष केंद्रित करा. एकाच वेळी अनेक गोष्टी होणार नाहीत हे लक्षात घ्या. एक पाऊल पुढे टाका. यामुळे गोंधळायला होणार नाही.

✻ तुमच्या आरोग्याला प्राधान्य द्या. मानसिक आणि शारीरिक असं दोन्ही प्रकारचं आरोग्य महत्त्वाचं आहे हे लक्षात घ्या. भरपूर पाणी प्या. आरोग्यदायी पदार्थ खा.

✻ वेळेचं नियोजन सर्वाधिक महत्त्वाचं आहे हे लक्षात घ्या. बिनमहत्त्वाच्या गोष्टी करण्यात वेळ घालवू नका.

✻ कुटुंबासोबत वेळ घालवा. स्वत:लाही वेळ द्या. त्यात कसूर करू नका. यानंतर कामाला प्राधान्य द्या. कामाच्या घाईत स्वत:चा वेळ वाया घालवू नका.

✻ सायकोलॉजिस्टची मदत घ्या. मानसिक विकारांवर लागलीच उपचार करून घ्या.

## हटके एथनिक्स...

**फॅशन पॅशन**



सध्या दिवाळीचा माहोल आहे. दिवाळीसारख्या पारंपरिक सणाला काही तरी एथनिक ट्राय केलं जातं. लवकरच लग्नसराईचा मोसमही सुरूहोईल. लग्नाच्या निमित्ताने वेगवेगळे आउटफिट्स ट्राय केले जातात. पण एथनिक्स म्हटले की मुलांकडे मर्यादित पर्याय उरतात. कुर्ता आणि चुडीदार हा कॉमन पेहराव कॅरी केला जातो पण मुलांच्या एथनिक्समध्येही खूप व्हरायटी आहे. थोडंसं हटके, वेगळं काही तरी ट्राय केलं पाहिजे. एथनिक्सचे हे काही कूल ऑप्शन्स...

✻ नेहमीच्या स्ट्रेट कुर्त्याऐवजी अनारकली ट्राय करता येईल. अनारकली म्हणून भुवया उंचावल्या का? पण मित्रांनो, हा पॅटर्न मुलंही कॅरी करू शकतात. अनारकली कुर्ता आणि सोबत पँट कॅरी करता येईल. थंडीच्या दिवसात एंब्रॉयडरीवाला स्टोलही घेता येईल. या पेहरावामुळे तुम्हाला राजेशाही लूक मिळेल.

✻ सिल्क ट्विड बंदगळा आणि सिल्कची ट्राउझर हा सुद्धा कूल ऑप्शन आहे. आता थंडी सुरू होईल. या दिवसात सिल्क घालायला काहीच हरकत नाही.

✻ कॉटन सिल्क धोती आणि कुर्ता हा पेहरावही बेस्ट आहे मित्रांनो. शॉर्ट कुर्ता आणि नेहरू जॅकेट असा पेहराव करून लग्नाला जा. नजरा तुमच्याकडे वळल्या म्हणूनच समजा.

✻ फार झकपक लूक नकोय. सोबर, सिंपल असं काही तरी हवंय. पण त्यातही फॅशन हवी, डौल हवा असं वाटतंय का? मग तुम्ही छानसा प्रिंटेड कुर्ता कॅरी करू शकता. फ्लोरल प्रिंटचा ऑप्शन ट्राय करता येईल. पण यासोबत चुडीदार किंवा पटियाला घालू नका. काउल पँट घाला.

## दुष्परिणाम धुम्रपानाचे...

**थोडं महत्वाचं...**

धूम्रपानाचं व्यसन आरोग्यासाठी हानीकारक मानलं जातं पण सततच्या धूम्रपानामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वावरही परिणाम होतो. आपण वयापेक्षा म्हातारे दिसू लागतो. धूम्रपानामुळे त्वचेवर दुष्परिणाम होतात. त्यामुळे हे व्यसन वेळीच सोडणं गरजेचं आहे. याबाबत जाणून घेऊ या...

✻ आपल्या त्वचेवर अनेक गोष्टींचा परिणाम होत असतो. पण धूम्रपानामुळे आपण खूप लवकर म्हातारे दिसू लागतो. धूम्रपान करणाऱ्यांच्या त्वचेवर सुरकुत्या पडल्याचं आपण पाहतो. धुरामुळे त्वचेतले इलॅस्टिक फायबर ढिले पडतात. धूम्रपानामुळे रक्तातल्या ऑक्सिजनचं प्रमाण कमी होऊन त्वचा निस्तेज दिसू लागते.

✻ डोळ्यांच्या आसपास सुरकुत्या पडल्याचं आपण पाहतो. धूम्रपानामुळे डोळ्यांच्या आसपास खूप लवकर सुरकुत्या पडतात. सिगारेटचा धूर आणि उष्णतेमुळे असं होतं.

✻ धूम्रपानामुळे दात खराब होतात. तसंच हिरड्यांच्या समस्या निर्माण होतात. पांढरेशुभ्र दात आपलं व्यक्तिमत्त्व खुलवतात. त्यामुळे गोड हास्य हवं असेल तर धूम्रपान सोडा.

✻ धूम्रपानाचा परिणाम केसांवरही होतो. केस गळू लागतात. धूरामुळे विषद्रव्यं बाहेर पडतात.



यामुळे केसांच्या मुळांशी असलेल्या पोषक घटकांवर परिणाम होतो आणि केस गळू लागतात.

✻ तंबाखूमधल्या निकोटिनमुळे रक्तवाहिन्या टणक होतात. यामुळे चेहऱ्याला ऑक्सिजनयुक्त रक्ताचा पुरवठा होत नाही. शरीराच्या इतर भागालाही दूषित रक्ताचा पुरवठा होतो आणि तुमच्या जखमा लवकर भरून निघत नाहीत.

या दुष्परिणामांमुळे धूम्रपानाचं व्यसन सोडणंच योग्य ठरतं.

## त्वचा कोरडी पडतेय?

**स्कीन केअर**

**थंडी पडू लागल्यावर त्वचा कोरडी होते. अनेकांची त्वचा कोरडीच असते. कोरडी त्वचा आणि थंडीचा ३६ चा आकडा असतो. तुमची त्वचा कोरडी असेल तर आत्तापासूनच काळजी घ्या. यामुळे थंडीत त्वचा फुटणार नाही आणि फार त्रासही होणार नाही.**

तोंड धुण्यासाठी साध्या साबणाऐवजी लिक्विड क्लिंजर्सचा वापर करा. साबणामुळे कोरडी त्वचा अधिक कोरडी पडते. क्लिंजर्समधल्या घटकांमुळे त्वचा आतून स्वच्छ होते.

✻ मॉईश्चरायझर मस्ट आहे. काही क्लिंजर्समध्ये मॉईश्चरायझर असतं. पण तेलकट आणि नॉर्मल त्वचा असलेल्यांना असे क्लिंजर्स उपयुक्त ठरतात पण कोरडी त्वचा असणाऱ्यांनी मॉईश्चरायझर वापरायला हवं.

✻ थंडीत लोकरीचे कपडे घालावे लागतात. पण काही प्रकारच्या



कपड्यांमुळे त्वचेवर रॅश येतात. अशा वेळी लोकरीचा स्कार्फ छान दिसतो. पण लोकरीचा स्कार्फ त्वचेसाठी चांगला असेलच असं नाही. त्यातही कोरडी त्वचा असणाऱ्यांना लोकरीची ॲलर्जी होऊ शकते. त्यामुळे काळजी घ्या.

✻ गरम पाण्याऐवजी कोमट पाण्याचा वापर करा. यामुळे त्वचेतला ओलावा टिकून राहिल. थंडीत कडक पाणी घ्यावंसं वाटलं तरी हा मोह टाळा.

✻ लिप बामचा वापर करा. यामुळे ओठ कोरडे पडणार नाहीत. बाममध्ये एसपीएफ असणं गरजेचं आहे. त्यामुळे ओठांमधला ओलावा टिकून राहिल.

## करोडपती बनायचंय?

**मनी मॅनेजमेंट**

दोस्तांनो, करोडपती बनावं असं प्रत्येकालाच वाटत असतं. कौन बनेगा करोडपती किंवा तत्सम कार्यक्रमांमुळे तुम्ही तात्पुरते पैसे कमावता. पण आयुष्यात आर्थिक उद्दीष्ट गाठायचं असेल तर गुंतवणुकीला सुरूवात केली पाहिजे. या दिवाळीपासूनच बचतीचा शुभारंभ करा. दर महिन्याला अवघे ९०० रूपये वाचवून तुम्ही कोट्याधीश बनू शकता. जाणून घेऊया करोडपती बनण्याचे फंडे...

✻ तुम्ही २५ वर्षांचे आहात. ९०० रूपये बचतीची सुरूवात करताना तुम्ही सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅनचा विचार करू शकता. दीर्घकालीन गुंतवणूक केल्यास चक्रवाढव्याजामुळे तुम्ही कमी अवधीत करोडपती बनाल.

✻ म्युच्युअल फंडात वर्षाला सुमारे १२.५ टक्के दराने व्याज मिळतं असा इतिहास आहे. २५ व्या वर्षी ९०० रूपये बचतीने सुरूवात केली तर तुम्ही ६५ व्या वर्षी कोट्यधीश बनू शकता.

✻ महिन्याला तुम्ही ९०० रूपये गुंतवत आहात. गुंतवणुकीवर वर्षाला १२.५ टक्के दराने व्याज मिळेल. ४० वर्षांसाठी गुंतवणूक केल्यास ६५ व्या वर्षी तुमच्याकडे एक कोटी एक लाख ५५ हजार १६० रूपये असतील.




## टेक्नो टॉक

### डुप्लिकेट नंबर आहेत?

फोनमध्ये डुप्लिकेट नंबरचा भरणा होतो. हे नंबर डिलिट करणं कंटाळवाणं ठरतं. सोप्या पद्धतीने हे नंबर डिलिट करता येतील.




✻ जीमेल अकाउंटमध्ये जा.

✻ आता वरच्या बाजूला जीमेल आयकॉनवर क्लिक करा.

✻ आता कॉंटॅक्टवर क्लिक करा. आता इथे एक विंडो ओपन होईल. त्यात कॉंटॅक्ट दिसतील.

✻ तुमच्या फोटोखाली फाईंड डुप्लिकेट हा ऑप्शन दिसेल. त्यावर क्लिक करा.

✻ आता डिसमिसवर क्लिक करा. आता इथे वेगवेगळ्या नावाने कॉंटॅक्स सेव्ह करता येतील.

### वाढवा फोनचा स्पीड...

फोनचा स्पीड कमी झाल्याची तक्रार अनेक युजर्स करत असतात. कधी कधी तर फोन हॅंगही होतो. काही उपायांनी फोनचा स्पीड वाढवता येईल.



✻ फोनमधल्या प्रत्येक ॲपची बॅक अप आणि कॅच फाईल बनते. यामुळे फोन स्लो होतो. ॲप मॅनेजरमध्ये जाऊन या फाईल्स क्लीन करून टाका.

✻ वापरात नसलेली ॲप्स डिलिट करून टाका.

✻ फोन स्क्रीनवर दिसणारे आणि वापरात नसलेले विगेट्स डिलिट करून टाका.

✻ हेवी गेम्स डाउनलोड करू नका.

✻ क्लिनिंग ॲप्स डाउनलोड करून घ्या.

### पासवर्ड ट्रिक्स!

सोप्या पासवर्डमुळे तुमचा अकाउंट हॅक होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे पासवर्ड थोडा कठिणच ठेवला पाहिजे. अकाउंट हॅक होऊ नये यासाठी या ट्रिक्स आजमावता येतील. ✻ पासवर्ड म्हणून एखादं वाक्य ठेवा. हे वाक्य तुम्ही स्वत: तयार करू शकता. या वाक्यातल्या प्रत्येक शब्दाचं पहिलं अक्षर पासवर्ड म्हणून ठेवता येईल. ✻ पासवर्डसाठी छोट्या छोट्या ट्रिक्स वापरता येतील. ✻ ऑनलाईन बॅंकिंग तसंच क्रेडिट कार्डचा वापर करत असाल तर व्हेरिफिकेशन ॲलर्ट टाका. जीमेलमध्ये व्हेरिफिकेशन ॲलर्टची सोय आहे. दुसऱ्या पीसीवर तुमचा ईमेल ओपन होत असेल तर तुम्हाला पासवर्ड विचारला जाईल. ✻ पासवर्ड मोठा असू द्या. त्यात अक्षरं, नंबर आणि स्पेशल कॅरेक्टर्स असले पाहिजे. ✻ पासवर्ड मॅनेजरचा वापर करा. सगळ्या अकाउंट्सना एकच पासवर्ड ठेऊ नका.

### बॅटरी पॉवर वाचवण्यासाठी...

स्मार्टफोनमध्ये सुरू असणाऱ्या बऱ्याच ॲप्समुळे फोनची बॅटरी लवकर डाऊन होते. काही सेटिंग्जच्या मदतीने फोनची बॅटरी लाईफ वाढवता येऊ शकेल.

✻ स्क्रीन टाईमआउट सेट करा. यामुळे वापर होत नसताना फोन आपोआप लॉक होऊन जाईल. बॅटरी पॉवर वाचेल.




✻ नको असताना जीपीएस बंद करा. जीपीएसमुळे बॅटरी जास्त खर्च होते.

✻ पॉवर सेव्हिंग ऑप्शन ऑन करा. हा ऑप्शन नसेल तर गुगल प्लेवरून डाउनलोड करून घ्या.

## 'सिद्धार्थ वाणी'



उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

**''कीर्तनाचा खंजीर गेली, भीषण नरसंहार संपला''**

युद्धासारख्या कठीण परिस्थितीतही भगवंताचे स्मरण करणे किती फायदेशीर आहे हे व्यक्त करून आचार्यश्रींनी ४२ वी भक्तिपुष्कळ भगवान आदिनाथांच्या चरणी अर्पण केली आहे. हे परमेश्वरा! ज्या रणांगणात शत्रूचे घोडे शेजारी आहेत, हत्ती कर्णा वाजवत आहेत, सैनिक भयंकर आवाज करत आहेत अशा बलाढ्य शत्रू राजाचे सैन्य तुझ्या नावाचा जप करताच पळून जाताना दिसते. तसा अंधार दूर पळून जातो, सूर्य उगवतो. तुझ्या नामाचे कीर्तन सुरूच होताच भक्त शत्रूच्या भयापासून मुक्त होतो.

**आध्यात्मिक कीर्तन** :- प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीत कीर्तन ही परंपरा आहे. सामूहिक कीर्तनात सर्व भेदभाव दूर होतात. भेदभाव रहित करण्याचे उत्तम माध्यम म्हणजे संकीर्तन. संपूर्ण जग सामूहिक शुद्ध लहरींनी चैतन्यमय होते. अशुभ अणू नष्ट झाल्यानंतर शुभ अणूंचा प्रसार वाढू लागतो. कीर्तनाच्या भावनेने हिंसा, लबाडी, चोरी, लिंग, आसक्ती इ. पापी प्रवृत्तींपासून सहज मुक्तता मिळते. वैष्णव धर्मात जसे कीर्तनाला महत्त्व आहे, त्याचप्रमाणे आचार्यश्रींनी जैन धर्मातही कीर्तनाला मान्य केले आहे. भक्तशिरोमणी नामदेवांची बहीण भक्तिमती जमुनाबाई या ''विठ्ठल'' या नामाचे सतत स्मरण आणि कीर्तन करत असत. जमुनाबाई या विठ्ठलाच्या परमभक्त होत्या. शेणाच्या गोवऱ्या बनवतानाही हे नामस्मरण चालूच होते. एके दिवशी त्यांच्या गोवऱ्या चोरी झाल्या. नामदेव तिकडून आले व म्हणाले, बाई जमुनाच्या गोवऱ्या मी शोधूनच काढेल. त्यांनी शेजारच्या गोवऱ्यांना कान लावले व ऐकले ज्या गोवऱ्यात विठ्ठल विठ्ठलचे ध्वनि ऐकू येत होता, त्या सर्व जमुनाबाईला दिल्या. त्यामुळे भक्ताची प्रत्येक कृती पवित्र आहे. ''काम हीच पूजा'' असे म्हणतात. प्रस्तुत श्लोकात दिलेला 'कीर्तन' हा शब्द कीर्तनाचा केवळ शाब्दिक गायन प्रकार नसून ते उदयमान सूर्यकिरणांसारखे अलौकिक कीर्तन आहे.

**'नामकीर्तन संपुट** :- माझ्या शरीरात आणि मनात माझ्या आत्म्याच्या प्रत्येक छिद्रात, माझ्या आत्म्याच्या प्रत्येक भागात परमेश्वराच्या नामाचे कीर्तन चालू आहे. कीर्तनाच्या अनुभूतीत विशुद्ध ज्ञानाची किरणे बुडाली आहेत. माझ्या आत्म्याचा प्रत्येक भाग प्रकाशित होत आहे. सनातन, अज्ञान, आसक्ती आणि असत्य यांचा अंधार भगवंताच्या नामस्मरणाने दूर होत आहे. आता माझ्यातील बाह्य क्षेत्रात युद्ध कायमचे थांबले आहे. अज्ञानाच्या पांघरुणाखाली आत्म्याच्या प्रदेशात जे संभाव्य युद्ध चालू होते, त्यामुळे माझा आत्मा सतत जड होत होता. आता प्रत्येक श्वासात भगवंताचे नामस्मरण केल्याने माझा आत्मा फुलासारखा हलका झाला आहे. भगवंताचे नाव मनापासून विसरू नका. ते विसरणे योग्य नाही.

*** गाथा * (४२)**

**वल्गतुरंग - गजगर्जित - भीमनाद**
**माजौ बलं बलवता मपि भूपतिनाम् ।**
**उदयदिवाकर मयूख - शिखापविद्धम्**
**त्वत्कीर्तनात् तम इवाशु भिगा मुपैति..।।४२।।**

*** अर्थ- युद्ध विरोधी**

पराक्रमी राजाच्या सान्निध्यात, जिथे घोडे शेजारी असतात आणि हत्ती कर्णा वाजवत असतात तिथे भयंकर आवाज येतो. अशा शत्रू राजांच्या सैन्यातही तुझ्या नामस्मरणाने परिवर्तन होते. जसे सूर्य उगवण्याबरोबर सूर्याची किरणे पडतात, यामुळे रात्रीचा अंधार लवकरच नाहीसा होतो, म्हणजेच तुमच्या भक्तांना शत्रूच्या सैन्याची किंचितही भीती वाटत नाही.

*** उत्तरध्याय सूत्र ***

विसाव्या अध्ययनात महानिर्ग्रंथ अनाथी मुनिची कथा आहे. मगध सम्राट राजा श्रेणिकला अनाथी मुनींनी अनाथ आणि सनाथताची सुंदर व्याख्या सांगितली आहे. संसारात लोक त्यालाच नाथ मानतो, ज्याचे आई-वडील, स्त्री-पुरुष हे सर्व बांधले गेलेले मित्र आणि धन संपत्ति, भौतिक ऐश्वर्य भरपूर आहे. यामुळे असा समज होत कि, कष्ट आजार अडचणी आल्यावर स्वजन आणि आपली संपत्ती त्याची रक्षा करेल, परंतु हा गैरसमज आहे. बाह्य सर्व गोष्टी मिळवून देखल मानव अनाथ आहे, अप्रमतामुनि सनात आहे.

**- सौ. सविता चोरडिया**

# नाट्य संमेलनानिमित्त नगरमध्ये २५ ऑक्टोबरला 'झाडीपट्टी रंगभूमी नाट्य महोत्सवा'चे आयोजन

नगर - अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या शंभराव्या नाट्य संमेलनानिमित्त महाराष्ट्रभर सर्वत्र नाट्यकलेचा जागर, सांस्कृतिक महोत्सव, विविध नाट्यमहोत्सव, विभागीय नाट्य संमेलन असे विविध उपक्रम राबवले जात आहेत. याचाच भाग म्हणून झाडीपट्टी रंगभूमीची विविधता व तिची स्वतंत्र ओळख महाराष्ट्राला व्हावी, या हेतूने 'झाडीपट्टी नाट्य महोत्सवाचे' आयोजन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती, मुंबईच्या वतीने महाराष्ट्रभर करण्यात आलेले आहे.

अहिल्यानगर (अहमदनगर) शहरात २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता, माऊली सभागृह झोपडी कॅन्टीन, नगर -मनमाड रोड, येथे या महोत्सवातील एक नाट्य प्रयोग सादर होणार आहे. या नाट्य प्रयोगासाठी सर्व रसिक प्रेक्षकांनी यावे असे आवाहन नाट्य परिषद, मध्यवर्ती मुंबईचे अध्यक्ष अभिनेते प्रशांत दामले व कोषाध्यक्ष सतीश लोटके यांनी केले.

महाराष्ट्रातील पूर्व विदर्भातील दुर्गम भागात स्थिरावलेल्या झाडीपट्टीच्या रंगभूमीवरील नाटकांचे सादरीकरण या नाट्य महोत्सवाच्या रूपाने होणार आहे. सुमारे दीडशे वर्षांची नाट्य परंपरा लाभलेली, आपलं स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवत, वेगळी ओळख निर्माण करणारी रंगभूमी म्हणजेच झाडीपट्टी रंगभूमी.

महाराष्ट्राच्या पूर्वेकडील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया या पूर्व वैदर्भीय जिल्ह्यात झाडीपट्टी रंगभूमी विसावलेली आहे. बदलत्या काळात सामाजिक विषयाची व मनोरंजनात्मक नाटकांना झाडीपट्टीच्या रंगभूमीवर रसिकांची चांगली पसंती मिळत आहे. महाराष्ट्रातील मातब्बर नाटककारांनी लिहिलेल्या प्रकाशित नाटकांचे प्रयोग सादर होत असतानाच झाडीपट्टी रंगभूमीवर नवनवीन लेखक उदयास आले आहेत. झाडीपट्टीच्या ग्रामीण भागातील लेखकांच्या नाटकांना सध्यास्थितीत मोठ्या प्रमाणात मागणी आहे. रात्री सुरू




होणारं नाटक पहाटे - पहाटेपर्यंत सादर होतं, ही त्याची कालमर्यादा, हीच खरी ओळख झाडीपट्टी रंगभूमीची आहे. शहरी भागात दोन अंकी नाटकांचे सादरीकरण होतात, तर झाडीपट्टीच्या रंगभूमीवर अजूनही तीन अंकी नाटकांचे प्रयोग सादर होतात. शहरी भागात अद्यावत सुसज्ज नाट्यगृह आहेत. मात्र झाडीपट्टीच्या रंगभूमीवर रंगमंच व प्रेक्षागृह तात्पुरत्या स्वरूपात त्या त्या दिवशी, त्या त्या गावात कापडाच्या आणि बांबूच्या साह्याने उभारला जातो. एकाच ट्रक मध्ये रंगमंच कामगार, ध्वनी व्यवस्था, प्रकाशव्यवस्था व रंगमंच तसेच पेक्षागृह उभारण्याच्या सर्व साहित्यांची वाहतूक केल्या जाते. हजारोंच्या संख्येने कलाकार झाडीपट्टीच्या रंगभूमीवर कार्यरत आहे. यात मोठी आर्थिक उलाढाल होत असते. कलाकार, तंत्रज्ञ, रंगमंच कामगार छोट्या मोठ्या व्यवसायांवर आपले पोट भरणारे फिरस्ती दुकानदार, वाहन चालक - मालक व इतरही लोकांच्या उपजीविकेचे साधन झाडीपट्टी रंगभूमी झाली आहे. ५ महिने झाडीपट्टी रंगभूमीची सेवा करून मिळालेल्या पैशातून वर्षभराची आर्थिक तरतूद करून ठेवल्या जाते.

काही काही ठिकाणी एकाच गावात दोन दोन नाटकांचे प्रयोग होत असतात, तर काही काही ठिकाणी एकाच गावात एकाच वेळी ११ नाटकांचे प्रयोग सादर होत असतात. रसिकश्रोते कडाक्याच्या थंडीतही रात्रभर नाटक बघत असतात. संपूर्ण नाटक एकाच माइक वर सादर केले जाते. या झाडीपट्टी रंगभूमी नाट्य महोत्सवाचे साक्षीदार आपण होऊयात असे आवाहन नाट्य परिषद, मध्यवर्ती मुंबई चे कोषाध्यक्ष सतीश लोटके यांनी केले आहे.

रंगकर्मी रंगभूमी, वडसा या संस्थेचे 'गद्दार' नाटक सादर होणार आहे. या नाटकाचे दिग्दर्शक नरेश गडेकर यांनी केले आहे. लेखक आनंद भिमटे तर निर्माते नित्यानंद बुद्धे पाटील आहेत. यातील कलावंत अभिनेत्री आसावरी तिडके, माझ्या नवऱ्याची बायको या मालिकेत भूमिका करणारे अभिनेते देवेंद्र दोडके, देवेंद्र लुटे व नरेश गडेकर बालकलाकार- गंधर्व नरेश गडेकर, अरविंद झाडे, शुभम मसराम, रत्नदीप रंगारी, अमोल देऊलवार, करिष्मा मेश्राम, सुनैना खोब्रागडे आहेत.

मराठी रंगभूमी जपण्याची, जोपासण्याची व वृद्धिंगत करण्याचे काम झाडीपट्टी रंगभूमी करत आहे म्हणूनच या झाडीपट्टी रंगभूमीला १०० व्या नाट्य संमेलनात स्थान प्राप्त झाले आहे. ही कला महाराष्ट्रातील तमाम रसिक प्रेक्षकांना पाहता यावी या हेतूने नगर शहरातील माऊली सभागृह येथे २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता झाडीपट्टी रंगभूमी नाट्य प्रयोगाचे आयोजन केले आहे.

रसिकांसाठी प्रवेश निशुल्क आहे. आपण सर्वांनी या झाडीपट्टी रंगभूमी महोत्सव पाहण्यासाठी आवश्य यावे असे आवाहन नाट्य परिषद नगर शाखेचे अध्यक्ष अमोल खोले, नियामक मंडळ सदस्य क्षितिज झावरे, संजयकुमार दळवी यांनी केले.

# नगर शहरात २७ ऑक्टोबरला स्वर दिपावली संगीत मैफिलीचे आयोजन

### अंधांची स्वर दीपावली संगीत मैफिल आणणार दिवाळीला रंगत

नगर - दिव्यदृष्टी संस्थेने नगर शहरातील सावेडी येथील माऊली सभागृहात २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ ते ९ यावेळेत स्वर दिपावली या संगीत मैफिलीचे आयोजन केले आहे. स्वतः अंध- दिव्यांग असणारे कलाकार या संगीत मैफिलीत गायन वादन यांचे सादरीकरण करणार असून रसिक नगरकर यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन दिव्यदृष्टी संस्थेने केले आहे.

या स्वर मैफिलीचे उद्घाटन आदर्श गाव चळवळीचे प्रणेते पदमश्री पोपटराव पवार, धनेश बोगावत, शिल्पकार प्रमोद कांबळे, सिनेअभिनेते महेश काळे, उद्योजक एन बी धुमाळ, ब्रिगेडियर राजू चावला यांच्या उपस्थित होणार आहे. नगरकर यांनी या दिव्यदृष्टी संस्थेला पाठबळ व मैफिलीला उपस्थित राहण्याचे आवाहन दिव्यदृष्टीचे कृष्णा तवले, धवण उम्रेडकर, निलेश शिंदे, सुभाष शिंदे, सुनील बाचकर, किरण खेतमाळस यांनी केले आहे.




**स्वर दीपावली संगीत मैफिलीत या अंधांची ऐकायला मिळणार संगीत साधना**

गांधर्व विश्व विद्यालय व सुगम संगीत विद्यालय द्वारा संगीत विशारद निलेश शहादेव शिंदे, सुहास नरवडे तसेच अलका शिंदे, वर्षा पड्याळ हे या मैफिलीत गाणार आहेत. अंकुश जाधव, मनोज धावारे, स्वप्नील पड्याळ, सौदागर लोंढे, सलीम अत्तार, महेश नेऊल आदी कलाकार आपल्या संगीत सहभागातून या मैफिलीत उपस्थितांची मने रिझवणार आहेत.

नगर आकाशवाणीचे निवेदक नितीन जावळे या मैफिलीचे सूत्रसंचालन करणार आहेत. हे सर्व कलाकार अंध - दिव्यांग असल्याने रसिक नगर करांनी त्यांची उपस्थिती मैफिलीला द्यावी असे दिव्य दृष्टीच्या कलाकार यांनी नगरकर यांना कळविले आहे.

अंध-अपंग-मूकबधिर यांचे जीवन स्वावलंबी करण्यासाठी झगडणाऱ्या स्वतः दिव्यांग-अंध असणाऱ्यांची दिव्यदृष्टी ही संस्था नव्याने नगर शहर व जिल्ह्यात दिव्यांग यांच्या शिक्षणासाठी कार्यरत झाली आहे. स्वतः दिव्यांग असणारे या संस्थेचे सर्व संचालक समाजात प्रेरणा असल्याने अशा संस्थेच्या मैफिली यांना जनाधार मिळाल्यास चांगले दिव्यांग कलाकार समाजासमोर आणण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष कृष्णा तवले, संचालक सुभाष शिंदे, सचिव ढवण उम्रेडकर यांनी माध्यमांना सांगितले आहे.

शहर व जिल्ह्यातील अंध कलाकार यांना एकत्रित करून दिवाळी निमित्त येत्या रविवारी होणारी स्वर दीपावली ही संगीत दिवाळी ठरणार आहे. या संगीत मैफिलीस प्रायोजक, सह प्रायोजक म्हणून आर्थिक मदत सामाजिक संवेदनशील नगरकर करू शकणार आहेत.

या मैफिलींसाठी व संस्थेस दिलेल्या सर्व आर्थिक देणग्यांना आयकर कलम ८० जी नुसार आयकरात सवलत आहे. दिव्य दृष्टीला देणगी देण्यासाठी गायक निलेश शिंदे (९४२०१ ६१९२३), संस्थेचे संचालक सुभाष शिंदे (९०४९८३३०६०) यावर संपर्क करण्याचे आवाहन केले आहे.

# आधी दिवाळी करा आणि नंतर सहलीला या!

नगर - श्रीरेणुका ट्रॅव्हल सर्व्हिसेस यात्रा कंपनीने दिवाळीनंतर खास सहलींचे आयोजन केले आहे. यामध्ये ११ मारुती दर्शन, द्वारकादर्शन (एक धाम) गिरनारसह व गोवा सहलीचे खास आकर्षण आहे. दिवाळीदरम्यानच्या हिवाळ्यात या सहली होत असल्याने पर्यटकांना ही एक चांगली संधी देण्यात आली आहे, असे संचालिका सौ. शुभांगी क्षीरसागर यांनी सांगितले.

११ मारुती दर्शन सहल १३ ते १५ नोव्हेंबर अशी ३ दिवस असून, यामध्ये श्रीरामदास स्वामी स्थापित ११ मारुती दर्शनाचा लाभ सहभागितांना मिळणार आहे. श्री रामदास स्वामी स्थापित ११ मारुती दर्शनासह नरसोबाची वाडी, मोरगांव आदि ठिकाणे यामध्ये पाहता येतील.

नोव्हेंबर महिन्यातच १८ ते २८ दरम्यान ११ दिवस द्वारका दर्शन (एक धाम) गिरनारसह सहलीमध्ये गरुडेश्वर, कुबेर भंडारी, स्टॅच्यु ऑफ युनिटी (सरदार सरोवर), सोरटी सोमनाथ, पोरबंदर, नागनाथ (ज्योर्तिलिंग दर्शन), भालकातीर्थ, वेरावळ, गिरनार, मुळद्वारका, बेट द्वारका (एक धाम), डाकोरजी (प्रती पंढरपूर), मातृगया (सिध्दपुर), उंझा (उमियामाता) आदी ठिकाणांचा समावेश करण्यात आला असून, ही ठिकाणे पर्यटकांना ११ दिवसात पाहता येतील. ही व वरील ११ मारुती यात्रा २ बाय २ पुशबॅक सिट एअर सस्पेन्शन लक्झरी ४८ सीटर एसी बसने होणार आहे.

डिसेंबर महिन्यात होणाऱ्या १७ ते २२ दरम्यानच्या गोवा स्पेशल सहलीमध्ये कोल्हापूर, नृसिंहवाडी, साऊथ गोवा, नॉर्थ गोवा, ओल्ड गोवा, मंगेशी मंदिर, शांतादुर्गा मंदिर तसेच विविध बिचेस पर्यटकांना पाहण्यासाठी नेण्यात येणार आहे. ही यात्रा २ बाय २ पुशबॅक सिट एअर सस्पेन्शन लक्झरी ४९ सीटर एसी बसने होणार आहे.

सर्व शासकीय नियमांचे पालन कंपनीतर्फे करण्यात येत असून पर्यटकांच्या सुरक्षेची काळजी घेण्यात येते. या कंपनीमार्फत आयोजित करण्यात येणार्या सहलींसाठी मर्यादित जागा असल्याने व्यवस्थित सोय होते. सहलीमध्ये आयोजक पती-पत्नी तसेच कर्मचारीवर्ग सहभागी होतो. राहण्याची उत्तम सुविधा, घरगुती पद्धतीचे जेवण तसेच वृद्धांकडे वैयक्तिक लक्ष देण्यात येते. बस व रेल्वेने होणाऱ्या सर्व यात्रांचे अडव्हान्स बुकींग सुरू आहे, अशी माहिती श्यामकांत क्षीरसागर यांनी दिली.

वाजवी व रास्त दर असल्याने ही कंपनी अल्पकाळात लोकप्रिय ठरली असून पर्यटकांची कंपनीकडे खूप आधीच वेगवेगळ्या सहलींसाठी विचारणा होते. ही विश्वासाची पावती आहे, असे सौ. दिपा जोशी यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी व सहलींमध्ये सहभागी होण्यासाठी रेणुका ट्रॅव्हल्स सर्व्हिसेस (डॉ. पानसंबळ हॉस्पिटलमागे, कुष्ठधाम रोड, निलम स्टोअर्सजवळ, पोलिस कॉलनी, सावेडी, नगर, मोबाईल क्रमांक ९९२२२४०५१५ व ९४०५०३२६९८) आणि सौ. दिपा जोशी (मो. ८३७९८४१२६१, ९४०४४०१६९९) येथे संपर्क साधावा.

# भाऊबीजेनिमित्त माहेरच्या साडी उपक्रमाचे २३ ऑक्टोबर रोजी नगरमध्ये आयोजन

नगर - दिवाळीत भाऊबीजेनिमित्त वंचित समूहातील भगिनींना माहेरची साडी, फराळ, भेटवस्तू ई. स्नेहालय परिवारातर्फे दरवर्षी दिले जाते यंदाही माहेरची साडी या कार्यक्रमाचे आयोजन २३ ऑक्टोंबर रोजी सकाळी ११.३० वाजता करण्यात आले आहे. स्नेहालय पुनर्वसन संकुलातील रवींद्रनाथ टागोर सभागृहात आयोजित हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असल्याची माहिती स्नेहालयाच्या अध्यक्षा जया जोगदंड आणि सचिव डॉ. प्रीती भोंबे यांनी दिली.

ज्यांना भाऊ आणि माहेर असते अशा माता-भगिनींसाठी दिवाळीमधील भाऊबीजेचा दिवस अगदी खास असतो. प्रेमाचे प्रतिक असणारे वस्त्र आणि मिठाई त्यांना परंपरेने आपल्या भावाकडून दिली जाते. परंतु ज्यांना कोणीही भाऊ अथवा नातेवाईक नसतो, अशा माता - भगिनींसाठी मात्र दीपोत्सव एकाकीपणा, दुःख आणि निराशेने भरलेला असतो. अशा माता-भगिनींना भाऊबीजेनिमित्त माहेरची साडी देण्याचा उपक्रम १८ वर्षांपूर्वी सुरू झाला.

स्व. धर्मराज शंकर औटी गुरुजींची प्रेरणा आणि प्रयत्न यांमागे होती. दोन वर्षापूर्वी औटी गुरुजी यांचे निधन झाले. ते स्वतः गरीब, कष्टकरी आणि वंचित समूहातील महिलांसाठी अनेक सहृदयी भाऊ शोधून एकेक नवीन साडी गोळा करीत. औटी गुरुजी यांचे निधन झाले असले तरी त्यांनी सुरू केलेली माहेरच्या साडीची परंपरा यापुढे सामाजिक संस्थांनी निर्धाराने चालू ठेवली. या उपक्रमाच्या आयोजनात स्नेहालय, अभंग प्रतिष्ठान, (देहू - पुणे), ज्ञानगंगा सोशल फाउंडेशन, (तळवडे, जि. पुणे), रोटरी क्लब ऑफ अहमदनगर, स्नेहधारा फाउंडेशन आदी सामाजिक संस्थांनी योगदान दिले आहे.

या कार्यक्रमासाठी ह.भ.प. मा. पुरुषोत्तम महाराज मोरे (अध्यक्ष श्री संत तुकाराम महाराज संस्थान, देहू), ह.भ.प. शिवाजी महाराज मोरे (माजी अध्यक्ष श्री संत तुकाराम महाराज संस्थान, देहू संस्थान तथा विश्वस्त विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, श्रीक्षेत्र पंढरपूर), ह.भ.प. माणिक महाराज मोरे (विश्वस्त श्री संत तुकाराम महाराज संस्थान, देहू) यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

याशिवाय निंबा भांबरे, (जनरल मॅनेंजर महिंद्रा लॉंजीस्टीक कंपनी), सचिन भसे, (अध्यक्ष, अभंग प्रतिष्ठान, देहू), विकास कंद (माजी अध्यक्ष, अभंग प्रतिष्ठान, देहू), मळूराज धर्मराज औटी (सामाजिक कार्यकर्ते), डॉ. विक्रम पानसंबळ (वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर), शिवाजी जाधव, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, नितीन थाडे (अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ अहिल्यादनगर), निलेश बाठे, (संस्थापक सदस्य, ज्ञानगंगा फाउंडेशन), धीरज सिंग (प्रमुख, मानव संसाधन विभाग, महिंद्र लॉंजीस्टीक कंपनी), नामदेव टाचतोडे, (प्रकल्प प्रमुख, महिंद्र लॉंजीस्टीक कंपनी), विवेक ठाकूर, (टाटा मोटर्स क्रेडीट कोऑपरेटीव्ह सोसायटी), नितीन बोडके, (उद्योजक, गहुंजे, जि. पुणे) आदी प्रमुखांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार असल्याचे स्नेहालयचे संचालक प्रवीण मुत्याल यांनी सांगितले.




स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनी ट्रस्ट रक्तदान शिबिरात रक्तदान करताना रक्तदाते व प्रबोधिनी अध्यक्ष प्रमोद मुळे, उपाध्यक्ष रुपेश भंडारी, डॉ. गुप्ता, सचिन पेंढूरकर

# स्वामी विवेकानंद जनकल्याण रक्तपेढीतर्फे रक्तदान

भिंगार - गेली २८ वर्ष सामाजिक शैक्षणिक व सेवा विषयक उपक्रम राबवणाऱ्या स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनीने नगरच्या जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने देशमुख सांस्कृतिक हॉल खळेवाडी येथे आयोजित केलेल्या २३ व्या रक्तदान शिबिरात ११ महिलांसह १०९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. अशी माहिती प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रमोद मुळे यांनी दिली.

स्वामी विवेकानंदांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वललाने शिबिरास सुरुवात झाली. रक्तदान शिबिरासाठी श्रीमती शोभाताई भंडारी व परिवार यांनी आर्थिक सहकार्य केले. सचिन भंडारी व परिवारातील सदस्यांचे संस्थेच्यावतीने छत्रपती शिवाजीमहाराज यांची प्रतिमा देवून त्यांचा सन्मान करण्यात आला.

भिंगार मधील सामाजिक राजकीय व विविध क्षेत्रातील कार्यकर्ते यांचे सहकार्य लाभले असे शिबिर संयोजक गणेश तोतरे यांनी सांगितले.

रक्तपेढीचे कार्यवाह डॉ.दिलीप धनेश्वर व डॉ.चंगेडे यांनी शिबिरास भेट दिली. जनकल्याण रक्तपेढीचे डॉ. गुलशन गुप्ता, जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास मढीकर, तंत्रज्ञ, कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. आजवरच्या २३ शिबिरातून एकुण २ हजार ८०२ एवढ्या रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आल्याचे संस्थेचे सेवा प्रकल्प समिती प्रमुख व उपाध्यक्ष रुपेश भंडारी यांनी सांगितले. शिबिर यशस्वीतेसाठी कार्याध्यक्ष शिवप्रसाद काळे, सचिव राम घुले, सहसचिव सौ.विजया देशमुख, खजिनदार रितेश फिरोदिया, संचालक श्रीपाद मुंगी, रविंद्र राजू, रमेश वराडे, सुनील तरवडे, गोरक्ष वामन, सौ.शशिकला शेंडे, सौ.संगीता देऊळगावकर, सौ. स्वाती देशपांडे यांनी अथक परिश्रम घेतले.

# समस्त आंबेडकरी व मातंग समाजाच्यावतीने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा

नगर - माजी महापौर संदीप कोतकर यांचे बंधू सचिन कोतकर यांच्या कथित वायरल क्लिपसंदर्भात कारवाईच्या मागणीसाठी समस्त आंबेडकरी समाज व मातंग समाजाच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी अशोकराव गायकवाड, सुरेश बनसोडे, अजय साळवे, सुमेध गायकवाड, किरण दाभाडे, अनंत लोखंडे, रोहित आव्हाड, सुनील क्षेत्रे, सुशांत म्हस्के, नितीन कसबेकर, अनिल शेकटकर, पोपट पाथरे, पवन भिंगारदिवे, संदीप वाकचौरे, विजय गायकवाड, विशाल कांबळे, पोपट पाथरे, विजय वडागळे, प्रमोद आठवाल, अनिल तेजी, राज सिंग, सचिन पवार, प्रवीण वाघमारे, सुनील सकट, प्रकाश कांबळे, विशाल भिंगारदिवे, संतोष पाडळे, गजू भांडवलकर, निलेश बांगरे, दया गजभिये, अजिंक्य भिंगारदिवे, अनिल शेकटकर, दादा पेटारे, अंकुश मोहिते, प्रकाश वाघमारे, शाहू वडागळे, प्रकाश घोरपडे, प्रदीप वावरे, चेतन शेलार, बाबु पाचर्णे, सुनील सकट, सिद्धार्थ आढाव, सागर ठोकळ, पप्पू पाटील, विजय गायकवाड, विशाल गायकवाड, सिद्धांत गायकवाड, प्रतीक बारसे, योगेश थोरात, गणेश गायकवाड, जय कदम, अविनाश वानखेडे, बाळासाहेब निकम, विशाल चांदणे, सुरेश वैरागर, सचिन जमधडे, सागर पगारे, मोहन अल्हाट, प्रवीण नरवडे, विनोद भिंगारदिवे, सदाशिव भिंगारदिवे आधीसह महिला व समाज बांधव उपस्थित होते.



समस्त आंबेडकरी व मातंग समाजाच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, त्या वायरल रेकॉर्डिंग मुळे समस्त मागासवर्गीयांच्या भावना दुखावल्या गेल्या असून लवकरात लवकर चौकशी करून ॲट्रॉसिटी ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात यावा व कोतकर यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी असून अशा व्यक्तींची चौकशी करून २ दिवसात गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात यावी अन्यथा आंबेडकरी समाज हा रस्त्यावर उतरणार असल्याचे म्हटले आहे.

